उपनिषत्संग्रहः

तैत्तिरीयोपनिषत्

ब्रह्मवल्ली

टीकाप्राकृतार्थसहिता

अयं ग्रंथः

शमदमादिसंपत्तिमतामधिकारिणां परब्रह्मज्ञानावाप्त्यर्थं

रामचंद्रसूनुव्यंकटेशशर्मणा संस्कृतः

पुण्याख्यपत्तने

शनिवारवीथ्यां शिवाजीमुद्रणालये मुद्रितः

शाकाब्दाः १८०९.

[सर्वप्रकारकं स्वामित्वं स्वहस्ते स्थापितं]

मौल्यं द्वादश आणकाः

उपनिषत्संग्रह.

तैत्तिरीयोपनिषत्

ब्रम्हवल्ली.

संस्कृत टीका व मराठी अर्थ व समजुतीच्या टिपा ह्यांसहित.

हा ग्रंथ.

शांति, इंद्रियनिग्रह, वैराग्य इत्यादि गुणांनीं संपन्न अशा अधिकारी जनांस परमेश्वराचें ज्ञान मिळण्याकरितां

व्यंकटराव रामचंद्र

ह्यांनीं तयार केला तो

पुणें, शनवार पेंठ येथें,
श्री शिवाजी छापखान्यांत छापिला.

शके १८०७

[सर्व हक्क राखून ठेविले आहेत.]

किंमत १२ आणे.

शुद्धिपत्र.

—o—

उपोद्घात पृष्ठ ४ ओळ २२ "झाप" ह्याचे जागीं "झोंप" असें पाहिजे.
८ ,, २९ "सांगत" चे जागीं "सांगतो" असें पाहिजे.
१७ ,, २० "बसतो" चे ठिकाणीं "बसतें" पाहिजे.
२७ ,, २१ ह्या ओळीखालीं पुढें लिहिलेला मजकूर पाहिजे

"आणखी मुक्तावली, दिनकरी, रामरुद्री, गदाधरी इत्यादि जे न्यायशास्त्रावर प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्यांत जहदजहल्लक्षणा असा तिसरा प्रकार मुळींच सांगितलेला नाहीं. त्यांत उलटें असें सांगितलें आहे कीं लक्षणा दोन प्रकारची आहे, "जहत्स्वार्था" आणि "अजहत्स्वार्था." बहुतेक नैय्यायिक अद्वैती आहेत. जर जहदजहल्लक्षणा असती तर त्यांनीं आपल्या ग्रंथांत दिली असती. ह्यावरून जहदजहल्लक्षणा करण्याला न्यायशास्त्र अनुकूल नाहीं असें उघड होतें. लहान मुलांकरितां केलेल्या तर्कसंग्रहांतही अशी लक्षणा दिलेली नसून त्यावरील टीका दीपिका ह्यांत मात्र अशी लक्षणा आढळते व तिचें उदाहरण तत्वमसि हेंच दिलेले आहे. तथापि वर सांगितलेल्या ग्रंथापुढें दीपिकेची मातबरी कांहींच नसून दीपिकाकार अद्वैत असल्यामुळें त्यांनीं कदाचित् मतलबानें ही तिसरी लक्षणा ढकलून पाहण्याचा प्रयत्न केला असेल किंवा त्यांना न्याय शास्त्रावरील मोठमोठाले ग्रंथ कदाचित् माहीत नसतील."

उपनिषत् पृष्ट १ ओळ २१ "वक्तुं" चे जागीं "वक्तु" पाहिजे.
२ ,, १० "तत्" चे जागीं "तत्" पाहिजे.

११ "एषा" व "अभ्युक्ता" ह्यांच्या जागीं "**एषा**" व "**अभ्युक्ता**" असें पाहिजे.

१२ ,, २४ "तन्निर्वाक्क" च्या जागीं "तन्निर्वाक्ति" असें पाहिजे.

२० ,, २ "**एतस्मात**" च्या जागीं "**एतस्मात्**" पाहिजे.

४० ,, ६ "**श्रोत्रियस्य**" ह्याजपुढें "**च**" पाहिजे.

उपोद्घात.

सुख व दुःख ह्यांचा अनुभव केवळ शब्दांनीं आणून देतां येत नाहीं. जशी साखरेची गोडी, किंवा हिरव्या आंब्याचा आंबटपणा, किंवा तुरटीचा तुरटपणा, ह्यांची कल्पना शब्दांनीं आणून देतां येत नाहीं, तशी सुख व दुःख ह्यांची कल्पना केवळ शब्दांनीं दुसऱ्याच्या मनांत आणितां येत नाहीं. तथापि, अबालवृद्ध मनुष्यांना व इतर प्राण्यांना सुख व दुःख हीं उपजल्यापासूनच अनुभवानें समजतात. मूल उपजतांच आईचें थान चोखूं लागतें, तेव्हांच त्याला सुखाचें ज्ञान होतें, व त्याच्या अंगाला गार किंवा कढत पदार्थ लागला ह्मणजे दुःखाचें ज्ञान होतें. त्याला असें ज्ञान झाल्याचें त्याचें रडणें व मुकाट्यानें बसणें इत्यादि वर्तनावरून समजतें. मुंगी साखर खात असते किंवा ढेकूण अंगास चिकटून रक्त खात असतो तेव्हांच्या त्यांच्या स्थितीवरून व त्यांस तापलेल्या भुईवर किंवा तेलांत टाकले असतां तेव्हांच्या त्यांचें वर्तनावरून त्यांस सुख होतें किंवा दुःख होतें हें आपणास समजतें. तसेंच, एखाद्या फुलझाडाला सांजसकाळ पाणी घातलें असतां त्याचीं पानें हिरवींगार व फुलें टवटवीत दिसतात, व कांहीं दिवस पाणी घातलें नाहीं तर पानें व फुलें अगदीं सुकून वाळतात. आणखी कांहीं वनस्पतींना विषाचें पाणी घातलें असतां तेणेंकरून त्यांना दुःख होतें, असें त्यांच्या वर्तनावरून दिसतें. ह्यावरून सुखदुःखाचा अनुभव सर्व प्राण्यांना आहे.

ह्याप्रमाणें प्राण्यांना स्वाभाविक रीतीनें सुखाची गोडी लागल्यानें व दुःखाची अरुचि झाल्यानें आपणास दुःख अगदीं नसावें व पराकाष्ठेचें सुख असावें अशी इच्छा सर्व प्राणिमात्रांना आहे. ही इच्छा पूर्ण करण्यास्तव प्राणी अनेक प्रकारें झटत आहेत. कोणी पैसा मिळविण्याविषयीं, कोणी चांगलें नांव मिळविण्याविषयीं, कोणी विषयसुख मिळविण्याविषयीं, कोणी संतति प्राप्त होण्याविषयीं, ह्याप्रमाणें आपणास सुख होण्याच्या इच्छेनें लोक अनेक प्रकारें झटत आहेत. आपणास सुख व्हावें ह्या इच्छेशिवाय कोणीही मनुष्य कांहींही करण्याला

प्रवृत्त होत नाहीं. कोणी एकादा मनुष्य तळ्यांत बुडूं लागतो तेव्हां तें पाहून दुसरा कोणी मनुष्य त्याला काढण्याकरितां तळ्यांत उडी घालतो, तेव्हां तो त्याजवर उपकार करावा ह्या बुद्धीनें तें कृत्य करीत नाहीं, तर तशा प्रकारें संकटांत पडलेला मनुष्य पाहून त्याच्या मनाला जें दुःख वाटतें तें न वाटण्यास्तव त्याला संकटांतून काढण्याचा प्रयत्न करितो. ह्याप्रमाणें कोणी मनुष्य जें काहीं कृत्य करितो तें स्वार्थहेतूनें करितो. मुलाकरितां आईबाप, आईबापाकरितां मुलें, बायकोकरितां नवरा, नवऱ्याकरितां बायको, एकमेकांकरितां स्नेही जीं कृत्यें करितात तीं सर्व मुख्यत्वेंकरून आपणास सुख व्हावें ह्मणून करितात. हे सर्व आपलपोटे आहेत. त्यांत जो ब्रह्मप्राप्तीची इच्छा करितो त्याच्या सारखा पराकाष्ठेचा आपलपोटा दुसरा कोणीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. ह्याची जेवढी उडी आहे तेवढी दुसरी कोणाचीच नाहीं. इतर जे कोणी आपलपोटे आहेत ते ह्या जगांत जें यत्किंचित् सुख आहे त्याची इच्छा करितात, आणि त्याच्या प्राप्तीनें कांहींसे तृप्त होतात; परंतु जो ब्रह्म जाणण्याची इच्छा करितो तो ह्या जगांतील कोणत्याही सुखानें तृप्त होत नसून, तो येथील सुखास तुच्छ मानितो, आणि आपणास अखंड व अक्षय सुख मिळण्यास्तव परमेश्वराची प्राप्ति व्हावी अशी इच्छा बाळगितो, आणि ही येवढी मोठी इच्छा पूर्ण झाल्याशिवाय तृप्त होत नाहीं.

ह्यावरून सुखाची इच्छा सर्व प्राण्यांना आहे असें उघड होतें. आतां ह्या जगांतील कोणत्याही सुखाविषयीं विचार केला तथापि तें नेहमीं टिकणारें व त्यांत दुःख न मिसळलेलें असें नाहीं. कोणास संतति पुष्कळ आहे पण ते अन्नावांचून उपाशी मरत आहेत. कोणास संपत्ति आहे पण संतति मुळींच नसून त्याच्या मागें संपत्ति सरकारांत जाण्याची भीति आहे, कोणास संपत्ति आहे पण तो स्वतः नपुंसक असून दुसऱ्यापासून त्याच्या बायकोला पोरें झालीं आहेत. कोणास संपत्ति व संतति आहे, परंतु घरांतील माणसें कलह करणारीं किंवा दुर्गुणी आहेत. कोणास विद्या वगैरे यथास्थित असून रांडेच्या किंवा दारूच्या व्यसनानें त्यांची अपकीर्ति पसरली आहे. कोणी रोगग्रस्त होऊन मरणोन्मुख झालेला आहे. कोणास एकुलता एक मुलगा असून तो अकस्मात मेला

आणि त्याला पुत्रशोक झाला आहे. कोणास आपल्या लाडक्या मुलीचा नवरा मेला ह्मणून दुःख आहे. कोणाच्या घरीं पिशाचबाधा आहे. कोणा बाईचा नवरा उठून गेला आहे, किंवा घरीं आहे पण तिला कांहीं विचारीत नाहीं. कोणाचें दिवाळें वाजल्यामुळें तोंडचें पाणी पळालें आहे. कोणास राज्यांत दंगा चालला आहे किंवा बंड उठलें आहे किंवा परचक्र आलें आहे ह्मणून काळजी लागली आहे. कोणी लढाईंत गुंतले असून काय परिणाम होईल ह्याची भीति बाळगीत आहेत. कोणी वाघ, सिंह इत्यादि जनावरांच्या सपाट्यांत सांपडले आहेत. कोणी साप, विंचू इत्यादिकांच्या दंशानें व्याकुळ झाले आहेत. कोणी वीज कडकडून आपल्या अंगावर पडेल काय किंवा धरणीकंप होऊन किंवा ज्वालामुखी पर्वतांतून ज्वालाग्राही पदार्थ येऊन गांवचागांव गडप होतो कीं काय ह्या धोक्यांत आहेत. कोणी गांवामध्यें देवी, गोवर, पटकी, गुडघेमोडी इत्यादि आजार उत्पन्न झाल्यामुळें चिंताग्रस्त आहेत. कोणास अफू, गांज्या, बचनाग, सोमल इत्यादिकांपासून उपद्रव झाला आहे. कोणास समुद्रांत तुफान झाल्यामुळें आगबोट बुडून आपला जीव जातो किंवा आपला माल बुडेल ही धास्ती उत्पन्न झाली आहे. कोणास आपली अमुक इच्छा पूर्ण झाली नाहीं ह्मणून दुःख आहे. ह्याप्रमाणें सर्वांच्या पाठीमागें कांहींना कांहीं तरी दुःखें लागलीं आहेत.

येणेंप्रमाणें प्राणीमात्रांना जीं दुःखें आहेत त्यांचे तीन वर्ग केले आहेत---१ आध्यात्मिक, २ आधिभौतिक, आणि ३ आधिदैविक. घरदार, बायकापोरें ह्यांच्या चिंतेनें होणारें दुःख; काम, क्रोध, राग, द्वेष, हे मनांत आल्यानें होणारें दुःख; व शरीरास ज्वरादिकानें होणारें दुःख हीं आध्यात्मिक होत. वाघ, विंचू, इत्यादिकांपासून जी पीडा होते ती आधिभौतिक. देवी, पाऊस न पडल्यानें किंवा फार पाऊस पडून धान्य कुजल्यानें दुष्काळ पडणें, नवग्रहांची पीडा, इत्यादिक हीं आधिदैविक होत.

सुख आणि दुःख हे प्रत्यक्ष अनुभवाचे पदार्थ आहेत, ह्मणून सुख व दुःख असे पदार्थ वस्तुतः आहेत हे अनुभवसिद्ध आहे. आतां सुख हा पदार्थ कोठें आहे ह्याचा विचार करूं. आपल्या बाहेर जगतांतील

ज्या पदार्थांचा आपणास अनुभव येतो त्यांत आपणाला सुख व दुःख देण्याची शक्ति आहे कीं काय ?

सुखदुःख ह्या मनाच्या स्थिति आहेत. साधारण लोक असें समजतात कीं, आपल्या बाहेर जगतांत जे पदार्थ आहेत त्यांमध्यें आपणास सुख देण्याची शक्ति आहे. म्हणून त्यांना असें वाटतें कीं, ह्या जगांतच असावें व मरूं नये. परंतु ही अगदीं चूक आहे. आपणास सुख होण्याला जगांतील पदार्थांची अवश्यकता नाहीं. पाहा कीं, निद्रावस्थेमध्यें आपणाला जगांतील पदार्थांचें प्रत्यक्ष ज्ञान नसून स्वप्नामध्यें ज्या पदार्थांचें ज्ञान होतें त्यापासूनही सुख किंवा दुःख होतें. स्वप्नांत गोड खातो, हत्ती, घोडे इत्यादि दौलत मिळते, आपण नदी उतरून पार जातो किंवा नदींत बुडतो, आपली हजामत होते, आपलें लग्न होतें, सुंदर स्त्रीशीं संग घडतो, घाणेरडा पदार्थ अंगाला लागतो, आपलें घर पडतें किंवा जळतें,आपण किंवा आपला मित्र किंवा आपला शत्रु मरतो, इ० अशा अनेक प्रकारच्या स्वप्नानें आपणास सुख किंवा दुःख होतें. ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, सुख किंवा दुःख होण्याला ज्याग्रत अवस्थेंतील पदार्थच पाहिजेत असें नाहीं. म्हणून जर कोणा मनुष्याची ज्याग्रत अवस्था सतत जाऊन त्याला सतत स्वप्नावस्था प्राप्त झाली तथापि त्याला स्वप्नावस्थेंतील कल्पित पदार्थांपासूनही सुख किंवा दुःख होऊं शकेल. आतां ज्याग्रत अवस्थेंतील पदार्थ किंवा स्वप्नावस्थेंतील पदार्थ हे दोन्हीही पदार्थ नसले, तथापि सुषुप्ति अवस्थेंत म्हणजे गाढ झोप लागते तेव्हां सुख होतें. कारण गाढ झोंपेंतून मनुष्य उठला म्हणजे तो असें म्हणतो कीं, "मला फार गार झोंप लागली होता तेव्हां मला फार गोड वाटलें." ह्याच कारणास्तव पाहाटेच्या प्रहरीं जी गाढ झोप लागते तिला साखरझोंप असें म्हणतात. ह्या अवस्थेंत दुःख मुळींच नाहीं. ह्या अवस्थेंत मनुष्याला दुःखाचा संपर्क अगदीं सुटतो. ह्यावरून असें अनुमान होतें कीं, ह्याचे पुढील जी तुरीय अवस्था आहे तींत अतिशय सुख होत असलें पाहिजे. आणखी असें अनुमान निघतें कीं, आपणास सुख होण्याला सुख अनुभवणारा आपला आत्मा ह्याशिवाय दुसऱ्या पदार्थांची जरूरी नाहीं. सारांश, आपला आत्मा हाच सुखरूप आहे.

आतां आपणास बाहेरील कोणत्या एका पदार्थाचें ज्ञान होण्याची रीति कशी आहे ह्याजविषयीं आपण विचार करूं. जेव्हां आपणास बाहेरील पदार्थांचें ज्ञान आपले आंत होतें तेव्हां बाहेरील पदार्थ आपले आंत शिरत नाहीं हें तर उघडच आहे. तर मग ज्ञान कसें होतें? हें समजण्यास्तव उदाहरणार्थ डोळ्यानें पदार्थाचें ज्ञान कसें होतें तें पाहा. जो पदार्थ आपल्या डोळ्यापुढें येतो त्यावरील प्रकाशाचें किरण त्या पदार्थापासून परावृत्त होऊन आपल्या डोक्यांत शिरतात. मग जसें रस्त्यावरील खिडकीला एक भोंक ठेवून त्यांतून, रस्त्यावरून जाणाऱ्या मनुष्यें इत्यादिकांपासून परावृत्त झालेले किरण आंत येऊन छतावर त्यांची तसबीर उमटते, तसे डोळ्याच्या पाठीमागें पडदा आहे त्यावर त्या किरणांच्या योगानें डोळ्यापुढील पदार्थाची तसबीर उमटते. ह्या पडद्यापासून एक तंतु निघून तो डोक्यांतील मगजास जाऊन मिळतो. ह्या तंतूच्या द्वारानें त्या तसबिरीचें ज्ञान जातें, मग आपणास त्या पदार्थाचें ज्ञान होतें[1]. आतां प्रत्येक डोळ्यांत एकच ज्ञानतंतु असून असंख्याक पदार्थांचें ज्ञान कसें जातें? तर एकाच तारेंतून असंख्याक निरनिराळ्या बातम्या जशा जातात तसें ज्ञान जातें. हें ज्ञानतंतूंतून कसें जातें व तें पुढें कोण कसें घेतो हें अद्याप शारीर शास्त्रवेत्त्यांना समजलेलें नाहीं. ह्याचप्रमाणें घ्राणेंद्रियादिकांचेही तंतू आहेत, त्यांतून ज्ञान आपले डोक्यांतील मगजास जाऊन पोंचतें. ह्यावरून ज्ञानतंतूंनें ज्ञान जाऊन जी मगजाची स्थिति होते तीच ज्ञानास कारण आहे. एक फूल डोळ्यापुढें असतां मगजाची ज्याप्रमाणें स्थिति असते त्याप्रमाणें डोळ्यापुढें फूल नसतां मगजाची स्थिति कोणत्याही कारणानें झाल्यास फुलाचें ज्ञान होण्यास हरकत नाहीं. ह्याच संबंधानें एक गोष्ट सांगतो. दोन मनुष्यांचे मुलगे दूर देशीं गेले होते. त्यांपैकीं एका मनुष्याचा मुलगा मरण पावला आणि दुसऱ्याचा जिवंत होता. त्या जिवंत मुलग्यास बहुत ऐश्वर्य मिळालें होतें. त्यानें एका मनुष्याबरोबर आपल्या ऐश्वर्याचा व दुसऱ्याचे मरणाचा निरोप आपले

---

1 फास्टर्स फिजिआलजि, अ० ४ पृ० ५११; स्टुअर्टस् फिजिक्स, क० २८१; ऑर्डनर्स् आपटिक्स्, क० ३०६; डिश्चानल्स् न्याचरल् फिलासोफि, क० ७५२; ऑमेल्स आपटिक्स् आंड लाइट्, पृ० १०२; गेनोस् फिजिक्स्, क० ६१२.

गांवीं पाठविला. तेव्हां हा निरोप आणणारा गैरसमजूतदार असल्यामुळें त्यानें निरोप सांगण्यांत चूक केली. ऐश्वर्यवानाच्या बापास असें सांगितलें कीं, तुझा मुलगा मरण पावला, आणि दुसऱ्याच्या बापास असें सांगितलें कीं, तुझा मुलगा मोठा ऐश्वर्यवान झाला आहे. हें ऐकून जीवंत मुलाच्या बापास मोठें दुःख झालें व मेलेल्या मुलाच्या बापास मोठा आनंद झाला. ह्यावरून मुलगा खरोखर मेलेला असून तो सुखरूप असल्याच्या कल्पनेनेंच सुख होतें आणि मुलगा सुखरूप असूनही तो मेल्याची कल्पना आणिल्यानें दुःख होतें. ह्मणजे मुलगा खरोखर जीवंत असणें किंवा मरणें ह्या गोष्टींवर सुख किंवा दुःख अवलंबून नाहीं. ह्याप्रमाणें जगांतलि सर्व पदार्थांचा डोळे इत्यादि ज्ञानेंद्रियांवर व्यापार घडल्यानें जशी मगजाची स्थिति होते, तशी मगजाची स्थिति ते पदार्थ ह्या ज्ञानेंद्रियांवर व्यापार करीत नसूनही मगजाची स्थिति कोणत्याही कारणानें झाली, तर जग मिथ्या असूनही जग आहे असें ज्ञान होऊं शकेल. ह्याजवरून आपणाला सुख होण्याला ह्या जगांत जे पदार्थ आहेत त्यांचा आपल्या इंद्रियांवर व्यापार झालाच पाहिजे असें नाहीं. जग सत्य असो किंवा नसो, तथापि मगजाच्याच व्यापारानें जगाचें ज्ञान होऊं शकेल असें जरी मागील विचारावरून होतें, तरी जग सत्य आहे असें म्हणण्याला मुख्यत्वेंकरून एक सबळ कारण असें आहे कीं, आपल्याला जें ज्ञान होतें त्याच्या अनुरोधानें आपण आपल्या इच्छेप्रमाणें व्यापार केला असतां इच्छिल्याप्रमाणें इंद्रियांना अनुभव आल्याच्या योगानें पडताळे पाहतां येतात, आणि अशा प्रकारें ज्याचा अनुभव येतो त्यास सत्य पदार्थ असें आपण ह्मणतों.

जो इंद्रियनिग्रह करणारा आहे त्याला बाहेरील सुख देणारे पदार्थ सुख देऊं शकत नाहींत, व दुःख देणारे पदार्थ दुःख देऊं शकत नाहींत. ह्या सर्व गोष्टींवरून आपल्या सुखाला ह्या जगताची जरूरी नाहीं असें उघड होतें. सुखदुःखाची साधनें बाहेर नसून आपले अंतर्यामींच आहेत. आपणास सुख होण्याला मुख्यत्वेंकरून मन शांत ठेविलें पाहिजे. मन शांत ठेवण्याला इंद्रियनिग्रह केला पाहिजे. इंद्रिय निग्रह करण्याला वैराग्य संपादन केलें पाहिजे. वैराग्य संपादन करण्याला जगांतील सर्व पदार्थांचा अशाश्वतपणा पक्केपणीं जाणिला

पाहिजे. जगांतील पदार्थाचा अशाश्वतपणा जाणण्याला जगाच्या स्थितीविषयीं योग्य रीतीनें विचार केला पाहिजे. ह्या सर्व गोष्टी आपल्या स्वाधीन असल्यामुळें आपल्याला सुख करून घेण्याचें साधन आपल्याच हातीं आहे असें स्पष्ट होतें. उदाहरणार्थ, कोणी मनुष्य आपल्याला शिव्या देऊं लागला, किंवा दुसरें कांहीं वाईट करूं लागला, आणि त्यापासून आपण आपले मनांत कांहींच उद्गार उठूं दिले नाहींत, तर त्याच्या त्या कृत्यापासून आपणावर दुःखकारक कांहींच परिणाम होणार नाहीं. मात्र असें होण्याला मन दृढ अभ्यासानें तसें बनलें पाहिजे. असें मन होणें जरी अतिशय कठीण आहे, तथापि तसें होणें अगदीं शक्य आहे.

जगाची स्थिति फार भयंकर आहे! नीट शांततेनें लवकर विचार केला पाहिजे. बेसावध अगदीं राहूं नये. आपल्या परिणामाचा योग्य विचार करून खरें व नेहमीं टिकणारें सुखाची सामग्री करून ठेवण्याविषयीं योग्य प्रकारें झटलें पाहिजे. विषयांत गुंग होऊन राहूं नये. अज्ञानी व बेसावध मनुष्यास प्रथम नादीं लावून त्यास मायेच्या फाशांत गुंतून पाडण्याला जगासारखें दुसरें कांहीं नाहीं. ह्या जगांत मनुष्याला भुरळ पडल्यासारखें होतें; परंतु तेणेंकरून मोहित होऊं नये. ह्या मृत्युलोकीं आपली वास्तविक स्थिति कशी आहे ह्याविषयीं स्थिर चित्तानें लवकर व नेहमीं विचार करावा. आयुष्याचा एक घटकेचाही भरंवसा नाहीं. मृत्यु केव्हां व कोणत्या प्रकारें घाला घालील ह्याचा नियम नाहीं. दिवस सुखाचा गेला परंतु रात्र कशी लोटेल? रात्र सुखाची आहे परंतु दिवस कसा उगवेल? चालली घटका आनंदाची आहे परंतु दुसरी घटका कशी येईल? ह्याप्रमाणें प्रत्येक क्षणीं गंभीरपणें विचार करीत जावा. ही विनोदाची गोष्ट आहे असें समजूं नये. असा विचार करणाऱ्याला कदाचित् लोकही असें ह्मणतील कीं, "हे मोठे वेदांती झाले", तथापि त्या थट्टेकडे अगदीं लक्ष न देतां आपल्या कल्याणाकडे लक्ष द्यावें. आपलें घरदार, धनसंपत्ति, मुलेंबाळें, आप्तइष्ट, हे सर्व क्षणभंगुर आहेत. त्यांचा नाश होण्याची वेळ आली म्हणजे क्षणसुद्धां लागत नसून ताबडतोब त्यांचा फडशा पडतो. ह्याप्रमाणें आपल्या पाहण्यांत

नेहमीं येते. आपल्या स्वतांस अंतकाळ केव्हां प्राप्त होईल ह्याचा नियम नाहीं. मरणकाल आला म्हणजे ह्या सर्व जगाला आपण मुकण्याला कदाचित् क्षणही लागणार नाहीं, असें आपल्या डोळ्यापुढील दुसरीं उदाहरणें पाहिल्यावरून आढळतें. अशी ही मृत्युलोकींची वस्ती आहे. आपणास जेव्हां अखेरची वेळ येईल, व आपण हें जग लवकर सोडणार असें आपणास समजेल, तेव्हां आपणास कसें वाटेल! अशा वेळीं, जग नाशवंत आहे, जगाशीं आपला संबंध फारच थोडा, आपलें घरदार, बायकापोरें, सोयरेधायरे, इत्यादि सर्व जे आपले आहेत त्यांच्यापासून आपण लवकर निराळे होणार, आपण मेल्यावर आपली स्थिति काय होणार, मग आपणास आश्रय देणार व मदत करणार कोणी आहे कीं काय, मग आपणास दुःख प्राप्त झाल्यास कोणाची करुणा भाकावी, मग आपणास सुख कोणत्या प्रकारें प्राप्त होऊं शकेल, ह्याचा अगोदर विचार केला नाहीं, आयुष्य फुकट घालविलें, अशा प्रकारें कल्पनांचे अनेक तरंग मनांत उठून अतिशय दुःख वाटेल, व वाचा बंद झाल्यामुळें आपलें दुःख दुसऱ्यांस सांगतां येणार नाहीं, दुःखाच्या योगानें फक्त डोळ्यांत अश्रु येऊन पाणी घळघळा वाहूं लागेल!! अशा वेळीं काय विचार व तजवीज होणार आहे!!!

मनुष्याच्या पाठीमागें जें जन्ममरणाचें दुःख चिकटलेलें आहे तें परमेश्वराचें ज्ञान झाल्यावांचून सुटत नाहीं. ज्यास हें दुःख पतकरून ह्या जगांतील सुखाची इच्छा आहे, व तें इच्छिलेलें सुख परमेश्वराचे ज्ञानावांचून मिळण्याजोगें आहे, तर त्याला परमेश्वराचे ज्ञानाची मुळींच जरूरी नाहीं. जो कोणत्याही सुखाची इच्छा करीत नाहीं व कोणत्याही दुःखाची फिकिरी बाळगीत नाहीं त्यास, किंवा जो नास्तिक असेल त्यास, परमेश्वराची अगदीं गरज नाहीं. परंतु ज्याला दुःख अगदीं नको आणि पराकाष्ठेचें उत्तम व सतत मिळणारें असें सुख पाहिजे त्यानें परमेश्वराचें ज्ञान मिळविलेंच पाहिजे.

आतां परमेश्वराचें ज्ञान मिळविलें पाहिजें ह्मणून सांगितलें, तर ह्याचें कारण सांगतें. जो ज्या पदार्थाचा उत्पन्नकर्ता असतो त्याला त्या पदार्थाचें संरक्षण करण्याचें व त्याचा नाश करण्याचें सामर्थ्य असतें. जसें जो तांबट घागर करितो त्याला ती घागर फुटल्यास दुरुस्त करून नीट करण्याची व घागर मोडून टाकण्याची शक्ति असते. ह्मणून आपणास ज्यानें

उत्पन्न केलें आहे, म्हणजे ज्यानें आपणास देह दिला आहे, त्यास आपल्याला सुरक्षित ठेवण्याची व आपला नाश करण्याची शक्ति आहे. आपण जन्मास येण्यापूर्वी हल्लींच्या स्थितींत नसून, जन्मल्यानंतर हल्लींच्या स्थितींत आलों, ह्यावरून आपणास उत्पन्न कर्ता आहे हें उघड आहे. इतकें ठरल्यावर आपणास उत्पन्न करणारा कोण आहे ? येथें उत्पन्न करणारा ह्मणजे मूळ उत्पन्न करणारा असें समजावें. कारण बाप, आजा, पणजा, इ० हे एक प्रकारें आपले उत्पन्न कर्तेच आहेत ; तथापि, त्यांपैकीं कोणी आपला मूळ कर्ता नाहीं. आपला जो मूळ कर्ता तोच सर्व सृष्टीचा कर्ता असला पाहिजे. कारण, अनेक परमेश्वर संभवत नाहींत. जसें, कोळ्याचे पोटांतून कोळिष्टक निघतें व पुनः तें त्याच्या पोटांत जातें, त्याप्रमाणें परमेश्वरापासून सृष्टि उत्पन्न झाली व ती त्याच्या ठिकाणीं लय पावते. हेंच मनुष्याच्या उदाहरणानें स्पष्ट करितों. मनुष्याची उत्पत्ति रेतापासून होते. तो रेतांत असतो तेव्हां मनुष्यरूपानें त्याचें ज्ञान होत नाहीं. रेताची उत्पत्ति अन्नापासून होते. रेत अन्नांत असतें, तेव्हां रेतरूपानें त्याचें ज्ञान होत नाहीं. पृथ्वीपासून अन्न उत्पन्न होतें. अन्न पृथ्वींत असतें, तेव्हां अन्नरूपानें त्याचें ज्ञान होत नाहीं. पृथ्वी ह्मणजे मातीचें एक ढेकूळ पाण्यांत टाकलें तर पाण्यांत तें विरघळतें, आणि विरघळलेल्या स्थितींत त्याचें पृथ्वीच्या रूपानें ज्ञान होत नाहीं. पाण्यांत ऊष्णता मिळवून त्याची वाफ केली असतां वाफेंत अग्नीचें ज्ञान होतें, परंतु वाफेच्या अवस्थेंत पाण्याचें पाणी ह्या रूपानें ज्ञान होत नाहीं. वायूमध्यें ह्मणजे हवेंत दिवा जळतो. दिव्यावर भांडें झांकलें ह्मणजे हवा न मिळाल्यामुळें दिवा जातो. ह्याप्रमाणें वायूमध्यें अग्नि असतो तेव्हां अग्नीच्या रूपानें त्याचें ज्ञान होत नाहीं. आणखी वायूच्या बंदुकीनें जेव्हां बार काढितात, तेव्हां वायूपासून अग्नि निघतो. अंतराळींत वायु जेव्हां स्तब्ध असतो, तेव्हां आकाशांत वायुरूपानें त्याचें निराळें ज्ञान होत नाहीं. परंतु अंतराळींत जेव्हां पंखा हलवावा तेव्हां वायूचें ज्ञान होतें. आतां आकाश हें महत्वानें अनंत असून, त्यांत सर्व सृष्टीचा समावेश होतो. अशा आकाशाचा लय तशाच प्रकारच्या अनंत पदार्थांत झाला पाहिजे. तसा जो पदार्थ तो परमेश्वर. कारण

परमेश्वर हा संपूर्ण सृष्टीचा कर्ता असल्यामुळें त्यांत सर्व सृष्टीचा समावेश होतो हें काय सांगावें ! ह्यावरून परमेश्वरापासून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून उदक, उदकापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पति[1], वनस्पतीपासून अन्न, अन्नापासून रेत, आणि रेतापासून मनुष्य, अशी उत्पत्तीची मालिका लक्षांत ठेवावी.

आतां ईश्वराचा कोणी कर्ता आहे असें ह्मणावें तर तसें संभवत नाहीं. कारण,—

(१) ईश्वर आपला आपणच कर्ता होऊं शकत नाहीं. कारण, तो आपणास उत्पन्न करण्यापूर्वीं आपण असला पाहिजे; आणि कोणताही पदार्थ वस्तुतः असतो तेव्हां तो उत्पन्न व्हावयाचा आहे असें घडणें अशक्य असतें. ह्मणून अशा बाबतींत उत्पत्तिच संभवत नाहीं.

(२) ईश्वर आपण आपला कर्ता नसून, त्याचा कर्ता कोणी दुसरा ईश्वर आहे असें मानिलें, तर ह्या दुसऱ्या ईश्वराचा कर्ता कोण आहे अशी शंका निघेल. मग दुसरा ईश्वर आपण आपला कर्ता होऊं शकत नाहीं हें तर उघडच आहे. दुसऱ्या ईश्वराचा कर्ता पहिला ईश्वरही होऊं शकत नाहीं. कारण, पहिल्या ईश्वराच्या उत्पत्तीचें कारण दुसरा ईश्वर मानिल्यामुळें दुसऱ्या ईश्वराच्या उत्पत्तिपूर्वीं पहिला ईश्वर असूं शकत नाहीं, आणि दुसरा ईश्वर तर पहिल्या ईश्वराचा कर्ता झाल्यामुळें पहिल्याच्या उत्पत्तीपूर्वीं दुसरा असूं शकत नाहीं. जर दुसऱ्या ईश्वराचा कर्ता कोणी तिसरा ईश्वर मानावा, तर ह्या तिसऱ्या ईश्वराचा कर्ता कोण आहे, अशी शंका निघेल. तिसरा ईश्वर आपण आपला कर्ता होऊं शकत नाहीं. ज्या कारणास्तव दुसऱ्या ईश्वराचा कर्ता पहिला ईश्वर होऊं शकत नाहीं, त्याच कारणास्तव तिसऱ्या ईश्वराचा कर्ता दुसरा ईश्वर होऊं शकत

---

१ कोरफडीचें झाड घरांत नुसतें टांगून ठेविलें असतांही तें वाढतें. अशा प्रकारें वाढलेल्या कोरफडींत रस असतो म्हणून त्यांत उदक आहे. हें झाड वाळविलें असतां त्याची माती होते म्हणून अथवा त्याला वास आहे म्हणून त्यांत पृथ्वीचा अंश आहे. कोरफडीचा रस ऊष्ण आहे हें प्रसिद्ध आहे. ह्या उदाहरणावरून वायूपासून अग्नि, उदक, पृथ्वी, वनस्पति हीं उत्पन्न झाल्याचें उघड दिसून येतें.

नाहीं. तिसऱ्या ईश्वराचा कर्ता पहिला ईश्वर होऊं शकत नाहीं. कारण, पहिल्याचा कर्ता दुसरा, दुसऱ्याचा तिसरा, तिसऱ्याचा पहिला, पुनः पहिल्याचा तिसरा, इ० ह्याप्रमाणें तोच तो पुनःपुनः येत जातो. ह्मणून जर तिसऱ्या ईश्वराचा कर्ता कोणी चवथा ईश्वर मानावा, तर चवथ्याचा पांचवा मानावा लागेल. आणि येणकरून अनवस्थादोष (ह्मणजे कधीं संपावयाचाच नाहीं असा दोष) येईल. ह्यास्तव जगताचा कर्ता परमेश्वर ह्याचा दुसरा कोणी कर्ता नाहीं.

जो जें कार्य करितो त्यास तें कार्य व त्या कार्याचें **उपादान कारण** (म्हणजे ज्याच्या योगानें तें कार्य बनतें तें) ह्यांचें ज्ञान असलें पाहिजे. जसें, कोणीं घड्याळ केल्यास घड्याळ व ज्या योगानें घड्याळ बनतें तें, ह्यांचें ज्ञान असतें. म्हणून जगताचा कर्ता परमेश्वर ह्यास सर्व जगताचें व त्याचें उपादान कारणाचें ज्ञान असलें पाहिजे. म्हणून परमेश्वर **सर्वज्ञ** आहे.

सर्व जगत अद्भुत आहे. अद्भुत पदार्थ करण्यास कर्त्यामध्यें अद्भुत शक्ति असली पाहिजे. ह्मणून परमेश्वर **सर्वशक्तिमान** आहे.

जो अल्पशक्तिमान असतो तो पराधीन असतो. परमेश्वर अल्पशक्तिमान नसल्यामुळें पराधीन नाहीं. तर, तो सर्वशक्तिमान असल्यामुळें **स्वतंत्र** आहे.

ईश्वर सर्वशक्तिमान आहे, ह्मणून त्याच्या शक्तीपुढें कालाची शक्ति चालू शकत नाहीं. ह्मणून तो **नित्य** ह्मणजे भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही कालीं असणारा असा असला पाहिजे.

ईश्वर **सर्वव्यापी** असला पाहिजे. कारण, जर तो एकदेशीं राहणारा असेल, तर तो नित्य होणार नाहीं. जसें, जर मी आपले घरीं माडीवर असलों आणि नंतर खालीं गेलों, तर माडीवर माझा अभाव झाल्यामुळें मी अनित्य होतों. ह्मणजे, मी माडीवर नेहमीं राहणारा असा होत नाहीं.

आपला मूळ कर्ता परमेश्वर आहे, म्हणून आपलें कल्याण करण्याचें व आपला नाश करण्याचें त्याच्या स्वाधीन आहे. ह्यास्तव त्याची मर्जी संपादन करण्याची तजवीज केली पाहिजे. कोणाचीही मर्जी संपादन करण्यास त्याचें ज्ञान झालें पाहिजे. म्हणून प्रथम आपणास

परमेश्वराचें ज्ञान झालें पाहिजे. कोणाचेंही ज्ञान होण्यास त्याचे गुण समजले पाहिजेत. ह्मणून परमेश्वराचे गुण समजले पाहिजेत. आतां कोणाचेही गुण समजणें झाल्यास त्याच्या कृत्यावरून समजतें. ह्मणून परमेश्वराचे गुण समजण्यास्तव परमेश्वराचीं कृत्यें जी सृष्टि तिजविषयीं विचार केला पाहिजे. आतां सृष्टीचा योग्य विचार करण्यास्तव तत्वविचार केला पाहिजे. ह्मणून तत्वविचार थोडक्यांत सांगतों.

प्रथम तत्व म्हणजे काय हें सांगतों. जें जसें आहे तें तसें जाणणें ह्यास **प्रमा** म्हणतात. उदाहरण, सोन्याला सोनें असें जाणणें हें ज्ञान प्रमा होय; पितळाला सोनें असें जाणणें हें ज्ञान प्रमा नव्हे. प्रमेला ह्मणजे यथार्थ ज्ञानाला जो विषय असतो, तो म्हणजे मागील उदाहरणांत सोन्याला सोनें आहे, अशा यथार्थ ज्ञानाला विषय जें सोनें तें प्रमेय होय. प्रमेयाला **तत्व** म्हणतात. आतां तत्वाचें लक्षण दुसऱ्या प्रकारें सांगतां येतें, तें असें कीं, तत्व म्हणजे जें आरोपित नव्हे तें. उदाहरण, रुप्याचे ठिकाणीं रुपेपणा आरोपित नसून खरा आहे, म्हणून रुपें तत्व आहे. शिंपीच्या ठिकाणीं खरा रुपेपणा नसून, जो रुपेपणा आरोपित असतो, म्हणजे रुपेपणा आहे असें जें खोटें ज्ञान होतें तें तत्व नव्हे. तत्वें दोन प्रकारचीं आहेत. **१ स्वतंत्र** आणि **२ परतंत्र**. परमेश्वर हा एकच स्वतंत्र तत्व आहे. अस्वतंत्र तत्वें पुष्कळ आहेत. जसें, मनुष्य, पशु, पक्षी, झाड, माती, पाणी, प्रकाश, वायु, इ०. अस्वतंत्र तत्वें दोन प्रकारचीं आहेत.—**१ भाव** आणि **२ अभाव**. अनुभवानें पहिल्यानेंच आहे अशी जी प्रतीति होते तिला भाव असें म्हणतात. जसें, घोडा पाहिल्याबरोबर घोडा आहे असें जें अस्तित्वाचें ज्ञान तें भाव होय; आणि पहिल्याच अनुभवानें नाहीं अशी जी प्रतीति होते तिला अभाव म्हणतात. जसें, ह्या रानांत सिंह नाहीं, ह्या घरांत माणसें रहात नाहींत, ह्याला ज्ञान नाहीं, ह्या मनुष्याला जीव नाहीं, ह्याला मुलगा नाहीं, नपुसकाला पुरुषत्व नाहीं, इ०. अभाव तीन प्रकारचे आहेत.—**१ प्रागभाव**, **२ प्रध्वंसाभाव**, आणि **३ सदाभाव**. कोणती एक वस्तु उत्पन्न होण्यापूर्वीं जो अभाव असतो तो **प्रागभाव**. जसें, मनुष्य जन्मण्यापूर्वी त्याचा जो अभाव तो प्रागभाव. पदार्थाचा नाश झाल्यावर त्याचा जो अभाव तो प्रध्वंसाभाव. जसें,

मनुष्य मेल्यावर किंवा घागर फुटल्यावर किंवा घर जळाल्यावर मनुष्याचा किंवा घागरीचा किंवा घराचा जो अभाव तो प्रध्वंसाभाव. जो अभाव नेहमीं असतो तो अत्यंताभाव. जसें, सशाचें शिंग, वांझेचा मुलगा, कांसवाचा केस, आकाशाचें फूल, असे पदार्थ कधींच नसल्यामुळें त्यांचा जो अभाव तो सदाभाव. सदाभावाला अत्यंताभाव असेंही ह्मणतात. भाव दोन प्रकारचा आहे—१ **चेतन** आणि २ **अचेतन.** ज्यास ज्ञानशक्ति आहे तें चेतन, आणि ज्यास ज्ञानशक्ति नाहीं तें अचेतन. उदाहरण, जीव हा अस्वतंत्र चेतन आहे, आणि दगड, माती, लांकूड, सोनें, रुपें, इत्यादि अचेतन ह्मणजे जड आहेत.

चेतन दोन प्रकारचे आहेत—१ **दुःखस्पृष्ट,** आणि २ **दुःखास्पृष्ट.** ज्यांना दुःखाचा स्पर्श आहे तें दुःखस्पृष्ट. ज्यांस दुःखाचा स्पर्श नाहीं ते दुःखास्पृष्ट. जसें, परमेश्वराच्या बायकोशिवाय इतर सर्व जीव हे दुःखस्पृष्ट चेतन आहेत, आणि परमेश्वराची बायको मात्र दुःखास्पृष्ट चेतन आहे. दुःखस्पृष्ट चेतन दोन प्रकारचे आहेत—१ दुःखांतून मोकळे झालेले, जसें ब्रह्मादिक मुक्त जीव; आणि २ दुःखांत असलेले, जसें संसारांत असलेले जीव. दुःखांत असलेले जीव तीन प्रकारचे आहेत—१ उत्तम, २ मध्यम, आणि ३ कनिष्ठ. जे मुक्ति मिळण्याला योग्य आहेत ते उत्तम, जे नेहमीं संसारांत असतात ते मध्यम, आणि ज्यांची योग्यता नरकांत राहण्याची आहे ते कनिष्ठ. ह्यांपैकीं जे उत्तम ते पांच प्रकारचे आहेत—१ देव, २ ऋषि, ३ पितर, ४ चक्रवर्ती राजे, आणि ५ मनुष्यांतलि उत्तम मनुष्यें. जे कनिष्ठ ते चार प्रकारचे आहेत—१ दैत्य, २ राक्षस, ३ पिशाच, आणि ४ अधम मनुष्यें. ह्या चार प्रकारांपैकीं प्रत्येक प्रकाराचे दोन दोन प्रकार आहेत—१ नरकांत पडलेले, आणि २ प्रपंचांत असलेले.

आतां अचेतन म्हणजे जड पदार्थांचे विभाग सांगतों. जड तीन प्रकारचे आहेत—१ **नित्य,** २ **अनित्य,** आणि ३ **नित्यानित्य** ज्यास उत्पत्ति व नाश नाहींत ते नित्य; जसें, वेद म्हणजे अ आ इत्यादि ५० वर्ण, विकार न पावलेले आकाश, कालप्रवाह, पंचमहाभूतें, अकरा इंद्रियें, प्राण, सत्वादि तीन गूण, आणि तन्मात्रा. जे नित्य नव्हेत ते अनित्य होत; जसें, कालाचे विभाग म्हणजे पळें, घटिका, तास, दिवस,

इत्यादि, महत्तत्वाचे विकार ह्मणजे कार्यब्रम्हांड व त्यातील सर्व पदार्थ, हे सर्व अनित्य आहेत. कांहीं अंशीं नित्य व कांहीं अंशीं अनित्य असे जें ते नित्यानित्य होत. जसें, पुराणाला उत्पत्ति असल्यामुळें तें अनित्य आहे व त्याला नाश नसल्यामुळें तें नित्य आहे, म्हणून पुराण नित्यानित्य आहे. नित्यानित्य तीन प्रकारचें आहे--१ ज्यास उत्पत्ति असून नाश नाहीं, जसें पुराण; २ ज्याच्या कांहीं भागाला उत्पत्ति व नाश असून त्याच्या कांहीं भागाला दोन्हीही नाहींत, जसें कालाचे विकाररूप भाग पळे, घटिका इत्यादिकांना उत्पत्ति व नाश हीं असून प्रवाहरूप कालाला उत्पत्ति व नाश हीं दोन्ही नाहींत; ३ स्वरूपतः उत्पत्ति व नाशहीं नसून ही अवस्थेमुळें उत्पत्ती व नाश आहेत जशी प्रकृति. तथापि, येथें असें समजावें कीं, नित्यानित्य ह्यांचा अनित्यामध्यें समावेश होतो. अनित्याचे दोन प्रकार आहेत---१ असंसृष्ट, आणि २ संसृष्ट. महत्तत्व, अहंकार, बुद्धि, मन, दाहा इंद्रियें, पांच माहाभूतें, रूप, रस, गंध, स्पर्श, शब्द ह्या तन्मात्रा, हे असंसृष्ट आहेत. ब्रम्हांड व त्यांतील सर्व वस्तु हे संसृष्ट आहेत.

गुण, क्रिया, जाति, इत्यादि सर्व हे वस्तूचे धर्म आहेत. रूप, रस, गंध, इत्यादि गुण आहेत. वर उडणें, खालीं पडणें, इत्यादि क्रिया आहेत. सत्ता (ह्मणजे अस्तित्व) इत्यादि जाति होय. हे सर्व धर्म वस्तूचें रूपच आहेत. हें रूप दोन प्रकारचें आहे-१ जें रूप वस्तु आहे तेथपर्यंत असतें तें; जसें, सोन्याचा पिवळा रंग; २ जें रूपवस्तु असतांनाही नाहींसें होतें तें; जसें, आंबा कायम राहून त्याचा हिरवा रंग नाहींसा होऊन पिवळा होतो. ह्यावरून हें स्पष्ट आहे कीं, जेथें दुसऱ्या प्रकारचें रूप असतें तेथें तें रूप व वस्तु हीं दोन्हीं केव्हां भिन्न असतात व केव्हां अभिन्न असतात. परंतु वस्तु आहे तेथपर्यंत जें रूप असतें तें व वस्तु ह्यामध्यें भेद नसून तीं दोन्हीं एकच असतात.

जीं अस्वतंत्र तत्वें वर सांगितलीं त्या सर्वांची उत्पत्ति, संरक्षण व नाश करणें, ज्ञान देणें, मायेच्या बंधांत ठेवणें, बंधांतून मुक्त करणें, सुख व दुःख देणें, इत्यादि सर्व परमेश्वराच्या सामर्थ्यानें घडतें.

ह्यास्तव परमेश्वराची मर्जी प्रसन्न करून घेण्यास्तव त्याच्याकडेसच लक्ष लावून त्याचें नेहमीं ध्यान केलें पाहिजे. परमेश्वर सर्वव्यापी अ-

सल्यामुळे सर्व ठिकाणीं आहे. परमेश्वर हा नियमन करणारा अशा रूपानें सर्व ठिकाणीं सर्व कालीं सर्व पदार्थांत आहे. ह्याप्रमाणें तो प्रत्येक मनुष्यांत आहे. मनुष्यामध्यें त्याचें असण्याचें मुख्य ठिकाण कोणतें ह्याचा आपण विचार करूं. मनुष्याच्या शरीराच्या निरनिराळ्या भागाच्या योग्यतेविषयीं विचार केला असतां शारीरिशास्त्र (इं० अनाटमि). ह्यावरून असें अढळतें कीं, शरीराच्या इतर सर्व भागांपेक्षां मस्तक व ह्रदय हीं ज्यास्त महत्वाचीं आहेत. ह्या दोहोंमध्यें ज्यास्त महत्वाचें कोणतें आहे ह्याचा विचार करण्यास्तव त्यांची रचना व कार्य हीं समजलीं पाहिजेत. ह्यास्तव एक प्रेत मिळवून त्याजवर खालीं लिहिल्याप्रमाणें प्रयोग करावा.

प्रथम मस्तकाची रचना समजण्यास्तव शस्त्रानें प्रेताच्या एका कानापासून टाळूवरून दुसऱ्या कानापर्यंत असलेलें कातडें हाडापर्यंत कापावें, आणि कापलेल्या ठिकाणापासून कातडें दोहों बाजूला सोलून मस्तकाची कवटी (इं० क्रयानिअम्) मोकळी करावी. ह्या कवटींत आठ हाडें आहेत. तीं येणेंप्रमाणे--१ कपाळाचें हाड (इं० फ्रांटल् बोन्), १ टाळूचे हाड (इं० स्फीनाइड् बोन्), २ आंखाची हाडकें (इं० टेंपरल् बोन्स्), १ मागचे हाड (इं० अक्सिपिटल् बोन्), टाळूच्या बाजूंकडील हाडकें (इं० परायटल् बोन्स्), आणि १ कपाळाखालीं आंत असलेले हाड (इं० एथमाइड् बोन्). हीं हाडकें परस्परांशीं जेथें लागलेलीं आहेत तेथें करवतीसारखे दाते असलेले जोड (इं० सूचर्स) आहेत. नंतर कपाळाचे वरचे बाजूला करवत आडवी लावून सगळी कवटी करवतून काढावी. मग आंत तीन पडदे आहेत--१ ला पडदा (इं० ड्यूरामेटर). २ रा पडदा (इं० आरक्नाइड्), आणि ३ रा पडदा (इं० पायामेटर). मग मगजावर तळहात ठेवून मगजाचा खालचा भाग वर होईल अशा प्रकारें बाहेर काढावा. मगजाचे चार भाग आहेत—१ (इं० मेड्युला आब्लांगेटा), २ (इं० पान्स् वेरोलाय), ३ (इं० सरीबेलम्), आणि ४ (इं० सरीब्रम्)[१].

---

१. ग्रेज् अनाटमि, आवृत्ति ५ पृ० ४६२; क्केन्स अनाटमि, आवृत्ति ७ पृ० ५१४; कर्कस् फिजिआलजि, आवृत्ति ७ पृ० ५१०; कार्पेंटर्स् फिजिआलजि,

प्राण्यांमध्यें मगजाच्या योगानें काय कार्य घडतें हें पाहण्यास्तव त्यांच्या डोक्यांतून मगजाचे दोन्ही गोलार्ध काढून प्रयोग करून पाहिल्यावरून जें अढळण्यांत येतें तें येणेंप्रमाणें[1].—

१. जर एका बेडकाच्या सरब्रिमचे भाग कापून काढिले आणि बाकीचा सर्व मगज कायम ठेविला, तर त्याचे ऐच्छिक व्यापार नाहींसे होतात. त्याला कांहीं उत्तेजक असल्याशिवाय त्याच्याकडून कार्य होत नाहीं. त्याला उत्तेजन दिल्यास पूर्ण मगज असलेल्या बेडकाप्रमाणें तो कार्यें करितो. त्याला पोहायाला, उडी मारायाला, व सरपटायाला लावितां येतें. त्याला पाठीवर ठेविला तर तो लगेच पूर्ववत् बसतो. त्याला फळीवर बसवून तो खालीं घसरेल अशा प्रकारें फळीचें एक टोंक वर उचललें, तर तो फळीवरून पडत नाहीं; परंतु तो सरपटत वर चढून घसरून न पडण्याजोग्या ठिकाणीं जाऊन बसतो. ह्याप्रमाणें कितीदांही फळी उचलली तथापि तो अशीच क्रिया करितो. फळी हालविली नाहीं तर तो एकसारखा स्तब्धच राहतो. त्याला पाण्यांत टाकिला तर तो लगेंच एकसारखा पोहूं लागतो, आणि कांहीं आधार सांपडला नाहीं तर अगदीं थके तोंपर्यंत पोहतच राहतो. पाण्यावर एक लहानसा लाकडाचा तुकडा सोडला तर तो लाकडाजवळ आला म्हणजे त्याजवर चढून उगाच बसतो. त्याच्या कुशीवर हळूच तडाका दिला तर तो ओरडूं लागतो, आणि एकसारखे तडाके देत गेल्यास एकसारखी त्याची डरोंकणी निघत जाते, ती अशी कीं, कोणास असें वाटेल कीं गायनवाद्य वाजत आहे. तो चालतो तेव्हां जिकडे पदार्थांची दाट छाया पडलेली असेल तिकडे जात नाहीं. वस्तुतः असा बेडूक, व पूर्ण मगज असलेला बेडूक, ह्या दोघांच्या वर्तनांत फारसा फरक दिसून येत नाहीं, परंतु पहिल्याला जसें उत्तेजन द्यावें तसें कार्य तो नियमानें करितो, तसा दुसऱ्याच्या वर्तनाचा नियम नाहीं. ते दोघेही यंत्राप्रमाणें कार्यें करितात, तथापि ज्याचा मगज पूर्ण असतो त्याचीं कार्यें त्याच्या इच्छेनुसार असतात.

आ० १ पृ० ५७५; होल्डन्स् ह्यूमन् आस्टिआलजि, आ० ४ पृ० ५३; फास्टर्स फिजिआलजि. आवृत्ति ३ पृ० ६०८; युज्र्फिजिआलजि, पृ० ५२८.

1. फास्टर्स फिजिआलजि, आ० ४ पृ० ६१०–६१३.

आतां जर एखाद्या बेडकांतून सरीब्रमचे गोलार्ध काढून टाकिलें, परंतु त्याचा मेडुला आब्लांगेटा, सरीबेलम् आणि दर्शनसंबंधाचे भाग कायम ठेविले, आणि दुसऱ्या एका बेडकामध्यें फक्त कणा कायम ठेविला, तर ह्या दोन बेडकांमध्यें मोठा फरक दृष्टीस पडतो. ह्या दुसऱ्या बेडकाला पाठीवर पाडला असतां तो उठण्याला प्रयत्न करीत नाहीं, व पायावर बसविला असतां साधारण बेडकाप्रमाणें न बसतां पायावर उपडा पडतो. त्याला पाण्यांत टाकिला असतां तो न पोहोतां आंत बुडतो. त्याला चिमुटलें तर तो सरकत नाहीं व उडी मारीत नाहीं. त्याच्या कुशीवर तडाके मारिले वर ओरडत नाहीं. त्यास फळीवर ठेवून फळी उचलली तर तो वर चढण्याविषयीं प्रयत्न न करितां मेल्याप्रमाणें खालीं पडतो.

पाखराच्या डोक्यांतून सरीब्रमचे गोलार्ध अगदीं काढून टाकिले तरी ते कित्येक महिने जिवंत राहतें, आणि त्याजविषयीं पुढील हकीगत दिसून येते. त्या पाखराचे बसण्याचे स्वाभाविक तऱ्हेंत कांहीं फरक होत नाहीं, आणि पाखरें झोंपी जातात तेव्हां जसे एका पायावर राहतात तसें तें एका पायावर अंग तोलून धरितें. त्याला स्वस्थ राहूं दिलें तर तें हालचाल न करितां तें स्तब्ध पुष्कळ वेळपर्यंत राहतें. त्याला हालविलें तर जागा सोडून थोडेंसें हालतें, आणि मग स्वस्थ राहूं दिलें तर पूर्वींप्रमाणें बसतें. त्याला कुशीवर किंवा पाठीवर ठेविलें असतां तें पायावर पुनः बसतें. त्याला हवेंत फेंकिलें असतां तें बरेंच अंतरावर उडत जाऊन मग स्वस्थ बसतें. तें वारंवार आपल्या चोंचीनें पंखाला डंवचितें, आपले पंख स्वच्छ करितें, आणि त्याच्या चोंचीजवळ दाणापाणी नेलें असतां दाणा खातें व पाणी पितें. त्वचेला साधारण उत्तेजक मिळाल्यासच हालतें असें नाहीं, तर एकदम नाद झाला किंवा प्रकाश पडला तरीही तें हालूं लागतें. तें जातां जातां मध्यें अडथळे आले तर कांहीं अंशीं टाळूं शकतें. तथापि ऐच्छिक व्यापाराचीं किंवा शहाणपणाचीं चिन्हें स्पष्ट दिसण्यांत येत नाहींत.

थान पिणाऱ्या प्राण्यांच्या संबंधानेंही असेंच परिणाम दिसून येतात. ससा किंवा घूस ह्यांजवर वर सांगितल्याप्रमाणें प्रयोग केला असतां

तेही उभे राहतात, पळतात, व उड्या मारतात ; कुशीवर किंवा उताणे ठेविलें तर उठून पुनः आपल्या पायावर बसतात. तसेंच राहूं दिलें तर बाहुलीप्रमाणें स्वस्थ बसतात. अशा सशाच्या नाकापुढें गाजर किंवा करमगड्याचें पान बरेच वेळ धरिलें तरी तो तिकडे लक्ष्य देत नाहीं, परंतु त्याच्या तोंडांत घांस घातला तर तो कुरमुडून खाऊं लागतो. त्याला हालविलें तर पुढें पळतो किंवा उडी मारतो, आणि वाटेंत कांहीं आडवें आलें तर तें थोडें बहुत टाळतो. त्याच्या डोक्यांतलि मेंदु कापतांना दर्शनतंतूस धक्का लागलेला नसेल तर त्याच्यापुढें चकचकीत उजेड धरिला तर जसा उजेड हालेल तसा तो आपलें डोकें फिरवितो, आणि त्याच्याजवळ मोठा कर्कश आवाज केला तर तो चालूं लागतो. चिमटा घेतला तर तो बहुधा लांब करुणास्वर काढितो. तथापि, दर्शनानें किंवा दुसरे प्रकारें बोध होऊन त्यास ज्ञान होतें असें वाटत नाहीं. लांब स्वर निघतो तो त्याला दुःख होतें त्या योगानें निघतो असें समजूं नये.तर परावृत्त व्यापार करणारे ज्ञानतंतूचें यंत्र पूर्ण नसल्यामुळें आवाज लांबला जातो. नेहमीं त्याचा हालण्याचालण्याचा जो व्यापार असेल तो चालतो; परंतु शाहाणपणा दिसून येत नाहीं. मगजाचा गोलार्ध व मेड्युला ह्यांमधलि मगजाचा भाग कापून काढिला असतां वर सांगितलेल्या हालण्याचालण्याचा प्रकार बहुतेक बंद होतो. त्याला अंग तोलून धरितां येत नाहीं, परंतु कुशीवर पडतो, आणि मगजाचा हल्लीं कापलेला भाग कापण्यापूर्वी तो ओरडण्याचा वगैरे व्यापार जसा करीत होता तसा न करितां कमी करितो.

कुत्र्यामध्यें मगजाचें जें वेंटोळें आहे त्याचा थोडा थोडा भाग वेळोवेळीं कापीत गेलें तर तो बरेच महिनेपर्यंत जीवंत राहून, त्याची प्रकृतीही बरी असते.

ह्या सर्व प्रयोगांवरून असें सिद्ध होतें कीं, थान पिणारे प्राणी इत्यादिकांमध्यें मगजाचें गोलार्ध कापून काढिल्यानें जरी ऐच्छिक व शाहाणपणाचीं कृत्यें सर्वांशीं बंद न होतां, तीं पुष्कळ कमी होतात असें आढळतें, तथापि त्या प्राण्यांच्या नेहमींच्या हालण्याचालण्याच्या प्रकारामध्यें फारसा फरक पडत नाहीं. ह्मणून ही हालचाल होण्या-

साठीं जें ज्ञानतंतूचें यंत्र लागतें तें मगजाच्या गोलार्धांमध्यें नसून, मगजाच्या दुसऱ्या कोणत्या तरी भागांत असलें पाहिजे. तें यंत्र मगजाच्या मध्यभागीं किंवा मागचे बाजूला असावें असें मानण्यास कांहीं कारणें आहेत.

शरीराच्या इतर सर्व भागांपेक्षां मगजाचें पोषणार्थ रक्ताचा जास्त पुरवठा लागतो, आणि ज्यांत आक्सिजन् पुष्कळ आहे असें रक्त लागतें. पुरुषाच्या मगजापेक्षां स्त्रीचा मगज वजनानें हलका असतो. ह्मातारपण येऊं लागलें ह्मणजे शरीराच्या दुसऱ्या भागांप्रमाणें मगजही कमी होऊं लागतो, व त्याच्या वेटोळ्यांचा डळडळीतपणा कमी होऊन तीं वेटोळीं सुरकुततात.

आतां मस्तकाप्रमाणें हृदयाचें सामान्य ज्ञान होण्यास्तव गळ्याच्या खळीपासून नीट काळिजापर्यंत मुडद्याचें कातडें शस्त्रानें चिरून दोन्ही बाजूचें कातडें सुमारें दोन तीन बोटें एकीकडे करावें; आणि चिरलेल्या जागीं असलेल्या हाडांच्या दोहों बाजूंनीं कात्रीनें कातरावें, ह्मणजे तें हाड बरगड्यापासून निराळें होतें. मग तें मधलें हाड वर उचलून हनवटीखालीं अडकवावें. नंतर आंत दोहों बाजूला फुप्फुसें दिसतात. डावे बाजूचें फुप्फुस कापून काढावें अगर एकीकडे करावें, ह्मणजे तेथें नारळांतल्या गोट्याप्रमाणें जो पदार्थ दिसतो तो हृदय (इं० हार्ट) होय.

मनुष्य जीवंत असतो तेव्हां हृदयांत रक्ताचा सांठा असतो. येथून धमन्यावाटें रक्त डोक्यांतील मगजाकडे वर जातें व पायाच्या नखापर्यंत जातें, आणि मग येणेंप्रमाणें शरीरांत फिरत गेलेलें जें रक्त अशुद्ध होतें तें शिरांच्या द्वारांनीं हृदयाकडे येऊन फुप्फुसांत जाऊन तेथें श्वासोश्वासानें आंत आलेल्या हवेंतून आक्सिजन् घेऊन शुद्ध होऊन तें पुनः पूर्वींप्रमाणें शरीरांत फिरायास जातें. ह्याप्रमाणें मनुष्य जीवंत असतो तोंपर्यंत एकसारखा व्यापार चालू असतो. कोणत्याही कारणानें हा व्यापार बंद झाला ह्मणजे मनुष्य मरतो. जीवंत मनुष्याच्या छातीच्या डावे बाजूला कान लाविला तर हृदयांतील रक्ताच्या व्यापाराचा आवाज लब्‌ढप् लब्‌ढप् असा ऐकूं येतो. मगजास रक्त पोंचण्याचें कोणतेही कारणानें बंद झालें तर लागेंच मनुष्य मरतो.

ह्यावरून मगज व हृदय हीं दोन्हीं सारखीं महत्वाचीं दिसतात. तथापि हृदयाचें महत्व जास्त आहे. कारण स्त्रीच्या गर्भाशयांत गर्भ असतो तेव्हां दुसऱ्या सर्व इंद्रियांचे व्यापार सुरू होण्यापूर्वीं हृदयाचा व्यापार प्रथम सुरू होतो[1] हा व्यापार येथें सुरू करणारी कांहीं शक्ति असली पाहिजे. ती शक्ति गर्भांतल्या जीवांत आहे असें ह्मणावें तर मनुष्य मरतो तेव्हां जीवाच्या इच्छेविरुद्ध हृदयाची गति कां बंद होते ? ह्यावरून जीवाची ती शक्ति नव्हे, तर परमेश्वराची शक्ति आहे. जसा, आगगाडीच्या पुढें लावलेल्या वाफेच्या यंत्रावर यंत्र चालविणारा राहून आगगाडी चालवितो व थांबवितो, तसा परमेश्वर मनुष्याच्या हृदयांत राहून जीवाचें नियमन करितो. ह्याप्रमाणें गर्भावस्थेंतील जीवालाही आरंभापासून परमेश्वर प्रेरणा करितो. तेव्हां जीवाला परम सुखरूप मोक्ष देण्याचें परमेश्वराच्या हातीं आहे हें काय सांगावें ! अशा परमेश्वराची प्रसन्नता होण्यास्तव त्याचें ज्ञान करून घेतलें पाहिजे. हें ज्ञान करून घेण्यास अंतःकरणाची शुद्धि झाली पाहिजे. अंतःकरणाची शुद्धि होण्यास सत्कर्मे केलीं पाहिजेत. सत्कर्मे कशीं करावींत हें समजण्यास्तव साधूची संगति केली पाहिजे. साधु ओळखण्यास्तव साधूचीं लक्षणें समजलीं पाहिजेत. साधूचीं लक्षणें भागवतामध्यें अनेक ठिकाणीं सांगितलीं आहेत. त्यांपैकीं एकादशस्कंधांत बाराव्या अध्यायांत श्लोक २९ पासून ३३ पर्यंत पांच श्लोकांत जीं सांगितलीं आहेत तीं येणें प्रमाणें——

कृपालुरकृतद्रोहस्तितिक्षुः सर्वदेहिनां ॥
सत्यसारोऽनवद्यात्मा समः सर्वोपकारकः ॥ २९ ॥
कामैरहतधीर्दांतो मृदुः शुचिरकिंचनः ॥
अनीहो मितभुक् शांतः स्थिरो मच्छरणो मुनिः ॥३०॥
अप्रमत्तो गभीरात्मा धृतिमान् जितषड्गुणः ॥
अमानी मानदः कल्पो मैत्रः कारुणिकः कविः ॥ ३१ ॥

---

१ मेडोज् म्यानुअल् आव् मिड्वाइफरि, आ० ४ पृ० ४०; लस्कस् सायन्स आंड आर्ट आव मिड्वाइफरि, (१८८२) पृ० ६३; लेशमन्स् सिस्टम् आव् मिडवाइफरि, आ० ३ पृ० १४२, १८१, १८३; कार्पेंटर्स ह्यूमन् फिजिआलजि, आ० ९ पृ० ९२३.

आज्ञायैवं गुणान्दोषान्मयादिष्टानपि स्वकान् ॥
धर्मान्संत्यज्य यः सर्वान् मां भजेत स सत्तमः ॥ ३२ ॥
ज्ञात्वाऽज्ञात्वाथ ये वै मां यावान्यश्चास्मि यादृशः ॥
भजंत्यनन्यभावेन ते मे भक्ततमा मताः ॥ ३३ ॥

ह्यांचा अर्थ असा आहे कीं, जो कृपाळू, कोणाचाही द्वेष न करणारा, क्षमा करणारा, निश्चल सत्यपणा असलेला, दुसऱ्याचा हेवा न करणारा, सुखदुःख समान मानणारा, सर्वांवर उपकार करणारा, विषयांच्या योगानें क्षोभ न पावणारा, बाहेरील इंद्रियांचा निग्रह करणारा, कोमल अंतःकरणाचा, सदाचारानें वागणारा, लोकांनीं द्रव्य दिलें तरी न घेणारा, दांभिकपणाच्या क्रिया न करणारा, प्राप्त होईल तसा आहार करणारा, शांत मनाचा, आपल्या धर्माविषयीं स्थिर बुद्धीचा, परमेश्वराच्याच आश्रयानें राहणारा, मनन करणारा, सावध राहणारा, निर्विकार बुद्धीचा, धैर्यवान्, भूक तहान शोक मोह वृद्धपणा व मरण ह्या सहा लाटांना जिंकणारा, सन्मानाची इच्छा न करणारा, दुसऱ्यांना मान देणारा, दुसऱ्यांना बोध करण्याविषयीं दक्ष, कोणासही न फसविणारा, लोभ न धरितां दयेनेंच प्रवृत्त होणारा, ज्ञानी, भक्तीला जे धर्म विरुद्ध आहेत ते वेदोक्त असले तरी त्यांचा त्याग करून परमेश्वराचीच भक्ति करणारा, व परमेश्वर सर्वव्यापी आणि अमर्यादित आहे असें जाणूनही अनन्य भावानें त्याची सेवा करणारा, अशा तीस लक्षणांनीं जो युक्त असेल त्यास साधु ह्मणावा. तसेंच, तृतीय स्कंधाचा अध्याय २९ श्लोक २१ पासून २४ पर्यंत ह्यांत साधूंचीं लक्षणें सांगितलीं आहेत.

परमेश्वराचें लक्षण सृष्टीचा कर्ता हें आहे. रामानुजाचार्य आपले सूत्रभाष्यांत असें दर्शवितात कीं, सृष्टीचा उत्पन्न करणारा, पालण करणारा व संहार करणारा हे सर्व धर्म मिळून परमेश्वराचें लक्षण आहे. ही चूक आहे. कारण, सृष्टीचा कर्ता येवढेंच परमेश्वराचें लक्षण केलें तर अतिव्याप्ति कोठें येते ? आणि जर अतिव्याप्ति येत नाहीं, तर तिन्ही धर्म मिळून लक्षण करण्याचें प्रयोजन काय ?

आतां जर कोणी अशी शंका घेईल कीं, जर परमेश्वर सर्वशक्तिमान आहे, तर आपण पुनः उत्पन्न होऊं नये अशा प्रकारें तो जग

कायम ठेवून आपला नाश करण्यास समर्थ असला पाहिजे, नाहीं तर त्याचें सर्वशक्तिमत्व नाहींसें होईल ; तर ह्या शंकेचें उत्तर असें आहे कीं, माझी आई वांझ आहे असें ह्मटल्यानें जसा व्याघाताचा दोष येतो तसा दोष ह्या शंकेला येतो ; कारण, परमेश्वराचें लक्षण **सर्व** सृष्टीचा कर्ता असें आहे, आणि जर परमेश्वर आपण पुनः उत्पन्न न होण्याजोगा आपला नाश करूं शकेल, तर तो आपल्या नाशानंतरची सृष्टि करणारा होऊं शकणार नाहीं, ह्मणजे तो **सर्व** सृष्टीचा कर्ता होऊं शकणार नाहीं, हें परमेश्वराच्या लक्षणाशीं विरुद्ध आहे. सर्व सृष्टीचा उत्पन्न कर्ता हें जें परमेश्वराचें लक्षण त्यांतच सर्वव्यापकत्व, सर्वशक्तिमत्व, सर्वज्ञत्व,ह्या धर्मांचा अंतर्भाव होतो. म्हणून परमेश्वराच्या लक्षणांतच ज्यांचा अंतर्भाव होतो असे जें सर्वव्यापकत्व इत्यादि धर्म आहेत त्यांपैकीं कोणत्याही एका धर्मांत कमीपणा झाला, तर परमेश्वराच्या लक्षणास बाध येतो, ह्मणजे परमेश्वराचाच अभाव होतो. परमेश्वर ह्यास पक्ष करून त्याजवर वर म्हटल्याप्रमाणें अल्पशक्तिमत्व साधण्याला पक्षच नाहींसा झाल्यामुळें तें दुष्ट अनुमान होतें. ह्या दोषास न्यायशास्त्रांत आश्रयासिद्धि असें ह्मणतात.

जर कोणी अशी शंका घेईल कीं, परमेश्वर परम दयाळू असल्यामुळें तो कोणास दुःख देण्याला इच्छिणार नाहीं, जगांत तर अनेक प्रकारचीं दुःखें दृष्टीस पडतात, आणखी जगाच्या कर्त्यानेंच जगांतील दुःखें उत्पन्न केलीं आहेत असें ह्मटलें पाहिजे, कारण दुःखें हीं जगताचा भाग आहे, दुःख उत्पन्न केलें नसतें तर दुःखरहित जगाची योग्यता हल्लींच्या जगापेक्षां ज्यास्त झाली असती, परमेश्वर जसा परम दयाळू आहे तसा सर्वशक्तिमान असता तर त्यानें दुःखरहित असें जग उत्पन्न केलें असतें, ह्यावरून परमेश्वर सर्वशक्तिमान नाहीं असें होतें, ह्या शंकेचें समाधान असें आहे कीं, हल्लींची शंका काढणारा परमेश्वरानें जसें जग करावें असें ह्मणतो तसें जग त्यानें केलें असतें तर पुनः त्यावर अशी शंका निघूं शकेल कीं, परमेश्वरानें सर्व जग सुखमय केलें आहे, ह्मणून त्याला कांहीं सुख व कांहीं दुःख असें असलेलें किंवा पूर्ण दुःख असलेलें किंवा सुख व दुःख हीं दोन्हीं नसलेलें असें जग उत्पन्न करण्याची त्यास शक्ति नसल्यामुळें

तो सर्वशक्तिमान नाहीं.[1] अशा प्रकारच्या शंकांच्या योगानें अनवस्था प्रसंग येतो. ह्मणून हल्लीं ज्या प्रकारें परमेश्वरानें आपल्या इच्छेनें जग उत्पन्न केलें आहे त्याहून निराळे प्रकारचें जगत उत्पन्न करण्याला त्याला शक्ति नाहीं असें सिद्ध होत नाहीं ह्मणून त्याच्या सर्वशक्तिमत्वाला कोणतेही प्रकारें बाध येत नाहीं.

जर कोणी अशी शंका करील कीं, जर परमेश्वर आहे, आणि तो सर्व व्यापी आहे, तर आपल्या इंद्रियाच्या विषयांचें जसें इंद्रियांनीं ज्ञान होतें तसें परमेश्वराचें पण कां ज्ञान होऊं नये? परमेश्वरानें लपून कां बसावें? त्याला कोणी मारील किंवा त्रास देईल अशी भीति आहे काय? तर ह्या शंकेचें उत्तर असें आहे कीं, अंधळयाला सूर्य दिसला नाहीं, किंवा बहिऱ्याला घंटा ऐकूं आली नाहीं, किंवा नुसत्या डोळ्यांला पाण्यांतील सूक्ष्म जीव दिसले नाहींत, तर हा आपल्या इंद्रियांचा दोष समजला पाहिजे, आणि सूर्य नाहीं, किंवा घंटा नाहीं, किंवा सूक्ष्म जीव नाहींत, असें होत नाहीं. ह्याचप्रमाणें परमेश्वर हा दिसण्याजोगा आहे, परंतु त्याला पाहण्याला ज्यांना योग्य अधिकार आहे ते मात्र पाहूं शकतात.

हिंदुस्थानांत जीव व ईश्वर ह्यासंबंधी तेवीस मतें आहेत. त्यांपैकीं बरींच मतें जीव व ईश्वर (ह्मणजे परब्रह्म) ह्यांच्या ऐक्यसंबंधापुरतीं सारखीं आहेत. परंतु ह्या ऐक्याशिवाय त्यांच्या त्यांच्या मतांच्या प्रक्रिया निरनिराळ्या आहेत. त्यांपैकीं एक मत अद्वैत हें आहे. अद्वैत वादी असें मानितात कीं, मायेमधून परब्रम्हाचें जें प्रतिबिंब पडतें तें शिव विष्णु इत्यादिक देव आहेत; त्याच परब्रह्माचें अविद्येमधून जें प्रतिबिंब पडतें तें जीव आहे; ह्यावरून जीव व परब्रह्म हे दोन्ही एकच आहेत; ह्मणून जीवाची अविद्यारूप उपाधि मग्चि ब्रह्म आहे अशा ज्ञानानें नाहींसा झाला ह्मणजे व्यवहारकालच्या जीवाला आपण परब्रह्म असल्याचा अनुभव येतो. शंकराचार्यांचें मत अद्वैतप्रतिपादक आहे.

त्या तेवीस मतांपैकीं द्वैत हें एक मत आहे. ह्या मताप्रमाणें पांच भेद आहेत—१ जीव व ईश्वर ह्यांचा भेद, २ एक जीव व दुसरा जीव

---

१ हें समाधान ज्या रीतीनें केलें आहे त्या रीतीस अशोकवनिकान्याय म्हणतात.

ह्यांचा भेद, ३ जड व ईश्वर ह्यांचा भेद, ४ जड व जीव ह्यांचा परस्पर भेद, आणि ५ जड व जड ह्यांचा परस्पर भेद; जगत सत्य आहे; तृणजीवापासून ब्रह्मदेवापर्यंत योग्यतेचें तारतम्य आहे; नारायण हा परब्रह्म असून ब्रह्मादिक सर्व जीव त्याच्या अधीन आहेत. मध्वाचार्यांचें मत द्वैतप्रतिपादक आहे.

शंकराचार्य व मध्वाचार्य हे दोन संन्यासी मोठे विद्वान होते. त्यांनीं उपनिषदें, गीता व ब्रह्मसूत्र ह्यांवर ग्रंथ केले आहेत. ते दोघे विलक्षण बुद्धीचे असल्यामुळें लोक त्यांना अवतारी पुरुष मानितात, व तसें सिद्ध करण्यास्तव श्रुति स्मृतींचीं वचनेंही दाखवितात. कदाचित् ते तसे असतील अगर नसतील.

जीव हा वस्तुत: ब्रह्म असून त्यास आपण ब्रह्माहून निराळा असा जीव आहो असें व्यवहारकालीं जें वाटतें ती भ्रांति आहे असें जें अद्वैतवादी म्हणतात तें बरोबर नाहीं. कारण भ्रांति उत्पन्न होण्याला भ्रांति उत्पन्न होण्यापूर्वीं भ्रांतीला मूळ असे दोन सत्य पदार्थांचें ज्ञान असणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, जर पूर्वीं खरी दोरी व खरा साप पाहिलेला असेल, तर त्यानंतर नुस्ती दोरी पाहून तिजवर सापाची भ्रांति होते, आणि खरी शिंप व खरें रुपें पूर्वीं पाहिलेलीं असल्यास पुढें शिंप पाहून एकादे वेळीं रुप्याची भ्रांति होते. ह्याप्रमाणें ब्रह्मावर जीवाची भ्रांति होण्याला अगोदर ब्रह्म व जीव हे दोन सत्य आहेत असें ज्ञान असणें अवश्य आहे. ह्याशिवाय भ्रांति होणार नाहीं. ह्मणून ब्रम्हावर जीवाची भ्रांति होते असें जें अद्वैत ग्रंथकार म्हणतात ते जीव व ब्रह्म हीं दोन्हीं निरनिराळीं असून सत्य आहेत असें कबूल करितात असें सिद्ध होतें. तसेंच जे अद्वैतवादी असें म्हणतात कीं, वस्तुत: सर्व ब्रह्मस्वरूपच असून जगत ब्रह्माहून निराळें आहे असें जें वाटतें ही भ्रांति आहे, तेही ब्रह्म व जगत हीं दोन्हीं निरानिराळीं असून सत्य आहेत असें कबूल करितात असें सिद्ध होतें.

अद्वैतवादी आपले अद्वैतमत सिद्ध करण्याला मुख्यत्वेंकरून "**तत्त्वमसि**" हें श्रुतिवचन पुढें आणितात, आणि त्या वाक्याचीं पदें **तत्, त्वं, असि,** अशीं पाडतात. असें म्हणतात कीं, **तत्** हें पद सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त परब्रह्म दर्शवितें, **त्वं** हें पद अल्पज्ञत्वादि धर्म-

युक्त जीव दर्शवितें; त्या तिन्ही पदांचा अर्थ "तें (म्हणजे सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त परब्रह्म) तूं (म्हणजे अल्पज्ञत्वादि धर्मयुक्त जीव) आहेस" असा होतो; "तें तूं आहेस" ह्या वाक्यानें "तें" आणि "तूं" ह्यांच्या ऐक्याचें विधान होतें; परंतु सर्वज्ञत्व व अल्पज्ञत्व असे दोन विरुद्ध धर्म असलेल्यांचें ऐक्य संभवत नाहीं; ह्मणून असा अर्थ करण्याला बाध येतो; ह्यास्तव अर्थाची जुळणी करण्यास्तव जहदजहल्लक्षणा (म्हणजे कांहीं सोडणें व कांहीं घेणें अशी युक्ति) योजिली पाहिजे, आणि तत् शब्दानें परब्रम्हाचें सर्वज्ञत्वादि धर्म टाकून देऊन चेतन मात्र घेतलें पाहिजे, आणि त्वं शब्दानें अल्पज्ञत्वादि धर्म टाकून देऊन चेतन मात्र घेतलें पाहिजे, म्हणजे दोन्ही चेतनांचें ऐक्य संभवतें. आतां अद्वैतवादींचें हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, सरळ व संदर्भास जुळेल असा अर्थ करण्याचें सोडून देऊन जहदजहल्लक्षणा करण्याच्या प्रयासांत कां पडावें? ह्याशिवाय अशी लक्षणा करूनही अद्वैतवादींचा हेतु सिद्धीस जात नाहीं, कारण तसें करूनही दोन चेतन मानणें भाग पडतें. ह्याशिवाय दोन चेतनांचें ऐक्य होण्याला एकाचा नाश झाला पाहिजे किंवा दोन्हींचा एक गट किंवा गठा बनला पाहिजे. परंतु हें संभवत नाहीं, कारण सर्व चेतन अनादि व नाशरहित आहेत हें अद्वैतमतवादीही कबूल करितात. आतां असें न करितां सरळ व सयुक्तिक अर्थ करण्याची रीति पुढें सांगितल्याप्रमाणें आहे. व्याकरणशास्त्रांत "सप्तसुप्रथमा" असा न्याय आहे. त्या न्यायानें तत् म्हणजे तस्य असें घेऊन वाक्याचा अर्थ "त्या संबंधी (म्हणजे परब्रम्हसंबंधी) तूं आहेस" ह्मणजे त्याचा तूं सेवक आहेस, असा अर्थ होतो. ह्या अर्थाला अनुसरून श्रुति, स्मृति, पुराणें ह्यांमध्यें पुष्कळ वचनेंही आहेत. ह्यांहीपेक्षां सुलभ व सरळ प्रकारें अर्थ करण्याची रीति अशी आहे कीं, "तत्वं" ह्या शब्दाचा विग्रह 'तस्य त्वं तत्वं' असा षष्ठीतत्पुरुष केला, तर ह्याचा अर्थ 'त्याचा तूं,' म्हणजे त्याचा (ह्मणजे परमात्म्याचा) तूं सेवक आहेस असा होतो. कारण, षष्ठीनें सेव्यसेवकभावाचा बोध होतो. ह्याशिवाय त्याचा अर्थ करण्याविषयीं सुगम व सयुक्तिक मार्ग आहे तो असा. छांदोग्योपनिषदाचा प्रपाठक ६ आम्हीं छापिलेला आहे, त्याचें पृष्ठ ३९, ३८,

३९, ४२, ४५, ४८, ५०, व ५२ इतक्या ठिकाणीं " तत्वमसि " हें वाक्य आलें असून प्रत्येक ठिकाणीं त्या वाक्याच्या पाठीमागें " स आत्मा " असें आलें आहे. म्हणून येथें तत् व अतत् अशीं दोन्हीं प्रकारें पदें सहज निघत असून " अतत् त्वं असि " ह्याचा अर्थ " परमेश्वर नव्हे असा तूं आहेस " असा होतो. जर कोणी ह्मणल कीं, असा पदच्छेद करणें क्लिष्ट आहे, तर त्यानें प्रथम येथें क्लेश कोणते आहेत ते दाखवावे. जो काव्याचा एखादा सर्ग पढलेला असून ज्यास व्याकरणाचे साधारण मूलतत्वाची माहिती असेल तो अशी शंका कधींही घेणार नाहीं. आतां जर कोणी अशी शंका घेईल कीं, " ब्रह्म नव्हेस असा तूं आहेस " असें श्वेतकेतूला सांगण्याचें कारण काय? कारण जीव व ब्रह्म हे एक आहेत अशी श्वेतकेतूची समज पूर्वीं झालेली आढळत नाहीं. ह्याचें समाधान सांगतों. १ लें "तत्व-मसि " ह्याचे पूर्वीं " स आत्मा " असें असून त्यावरून परमेश्वर आत्मा आहे असें सांगितलें, त्यावरून श्वेतकेतूस कदाचित् असें वाटेल कीं, परमेश्वर हा आत्मा आहे आणि आपणही आत्मा आहों ह्यामुळें परमेश्वर व आपण एक आहोंत. तर ही भ्रांति नाहींशी करण्यासाठीं भेद दाखविणें अवश्य आहे. २ रें, त्याच प्रपाठकाचा आरंभ झाल्यावर असतापासून सत् हें उत्पन्न झालें असें जें असद्वाद्यांचें मत तें दाखवून असतापासून सत् हें उत्पन्न होऊं शकत नाहीं असें सांगितलें. ह्या ठिकाणींही श्वेतकेतूच्या मनांत तशी शंका आली नसून असद्वाद्यांचे मतानें भ्रम उत्पन्न न होण्यास्तव तसें सांगितलें. त्याचप्रमाणें अद्वैतवाद्यांच्या मतानें भ्रांति उत्पन्न न होण्यास्तव भेद स्पष्ट दाखविला आहे. ३ रें श्वेतकेतु अध्ययन करून आल्यानंतर त्यास मोठा गर्व होऊन आपणापेक्षां मोठा कोणी नाहीं असें तो आप-णास मानूं लागला. हा त्याचा गर्व परिहार करण्याकरितां त्यास असें सिद्ध करून दाखविलें कीं, परमात्मा हाच स्वतंत्र असून त्याच्या-हून भिन्न प्रकारचा ह्मणजे परमात्म्याच्या अधीन असा तूं असल्यामुळें परमात्म्याप्रमाणें तूं नाहींस असें सांगितलें.

आणखी " अतत्वमसि " ह्याचा विग्रह न विद्यते तत् यस्य असा

केला तर त्याचा अर्थ असा होतो कीं, ज्यास ब्रह्म नाहीं (म्ह० ज्यास ब्रह्माची प्राप्ति नाहीं) असा तूं आहेस.

आणखी " अतत्वमसि " ह्यांत नञ तत्पुरुषसमास असून नञाचे सहा अर्थ व्याकरणशास्त्रांत सांगितले आहेत. त्यांपैकीं विरोध हा अर्थ येथें घेतला, तर असा अर्थ होतो कीं, परमात्म्याच्या विरुद्ध धर्म असलेला तूं आहेस, ह्मणजे, परमात्मा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व स्वतंत्र असून तूं अल्पज्ञ अल्पशक्तिमान व परतंत्र असा आहेस.

आतां " तत् त्वं असि " असा पदच्छेद केला ; तर तत् हें पंचम्यर्थी अव्यय घेतलें असतां त्यापासून तूं आहेस ह्मणजे त्यापासून तूं उत्पन्न झाला आहेस असा अर्थ होतो.

अद्वैतवादी लक्षणाकरून अर्थ करितात असें वर दाखविलें आहे. हें त्यांचें करणें दोषयुक्त आहे. लक्षणेनें अर्थ करणें हें शब्दशक्तीनें अर्थ करण्यापेक्षां गौण आहे. शब्देंदुशेखरांत ' उक्तार्थेलाक्षणिकत्वे तुल्लक्षणैवदोषः ' असें हलंत्य सूत्रावरील ' अनेकांता अनुबंधा' ह्या परिभाषेचे विचारांत सांगितलें आहे. परिभाषेंदुशेखरांत ह्याच परिभाषेचे विचारांत ' अंत्यशब्दे लक्षणाच न ' असें ह्मटलें आहे. महाभाष्यांत व कैय्यटांत ' अनेकाल्शित्सर्वस्य ' ह्या सूत्राखालींही तसेंच सांगितलें आहे. शिवाय शास्त्रांत व प्रचारांत जहल्लक्षणा व अजहल्लक्षणा अशा दोन लक्षणा निरनिराळ्या आहेत, परंतु जहदजहल्लक्षणा अशी अढळण्यांत येत नाहीं.

' तत्वमसि ' ह्याचा अद्वैतवादी जो अर्थ करितात तो बरोबर नाहीं असें दाखविणारीं श्रुतिवचनें बहुत आहेत व दुसरीं आणखीं कारणें आहेत. परंतु विस्तार भयास्तव त्या सर्वांचा येथें विचार केला नाहीं.

अद्वैतवादी, ' एकमेवाद्वितीयं ', ' नेहनानास्ति किंचन ', ' सर्वं खल्विदं ब्रम्ह ', ह्या वाक्यांना महावाक्यें समजून अद्वैत सिद्ध होतें असें समजतात. परंतु ' एकमेवाद्वितीयं ' ह्याचा अर्थ छांदोग्योपनिषदाचा प्रपाठक ६ पृ० ७ ह्याजवर लिहिलेला आहे ; त्याजवरून ब्रह्माहून कांहीं निराळें नाहीं असें होत नाहीं. ' नेहनानास्ति किंचन ' ह्याचा अर्थ कठोपनिषदाचा अध्याय २ पृ० ७ ह्याजवर लिहिलेला आहे.

वैदिक शब्दांचा ब्रह्मावर समन्वय कसा होऊं शकतो हें ब्रह्मसूत्राच्या पहिल्या अध्यायांत दाखविलें आहे. त्यावरून सर्व वैदिक शब्दांचें महत्व सारखें आहे असें होतें. असें असतां "तत्वमसि" इत्यादिक कांहीं थोड्याच वाक्यांना "महावाक्यें" असें ह्मणण्याचें कारण काय? तर तीं वाक्यें अद्वैत सिद्ध करण्याचें मतलबास फार उपयोगीं पडतात असें वाटल्यामुळें अद्वैतवादी त्यांस महावाक्यें असें ह्मणतात.

अद्वैतमतवादी असें मानितात कीं, सृष्टीच्या वेळीं ब्रह्मास मायेचा संबंध होऊन, ब्रम्ह संसारदशेंत येतें तेव्हां त्यास जीव अशी संज्ञा प्राप्त होते, आणि जीव व निर्गुण ब्रम्ह हीं दोन्हीं एक होणें ही मुक्ति आहे. असें मानिलें असतां मुक्तीस गेलेला जीव पुनः संसारांत येऊं शकेल. ह्मणून खरी मुक्ति संभवत नाहीं. अद्वैत्यांचें ब्रम्ह निर्विशेष व निरंश असल्यामुळें त्यांतील अमुकच भागाला मायेचा संबंध होऊन तो भाग संसारांत येतो असें ह्मणणें संभवत नाहीं. तेव्हां सर्वच ब्रह्म मायेच्या योगानें संसारांत येतें असें होतें. असें झालें असतां पूर्वी मुक्त झालेला जीव संसारांत आला पाहिजे. ह्याशिवाय जर सर्वच ब्रम्ह संसारांत येतें असें म्हणावें, तर हें संसारांत आलेलें सर्व ब्रम्ह मुक्तीच्या वेळीं कोणाशीं मिळतें? कारण मिळण्याला दुसरें कांहीं रहातच नाहीं. आणखी सर्व ब्रम्ह दुसरे कोणाशीं मिळतें असें ह्मणण्यानेंच अद्वैत मताचा नाश होत नाहीं काय? ह्मणून अद्वैत-मतवादी ह्यांना अद्वैत मताप्रमाणें मुक्तीच मिळणें अशक्य आहे असें सिद्ध होतें.

अद्वैतवादीचें ह्मणणें असें कीं, जीव व परब्रह्म एक आहेत, व द्वैतवादीचें ह्मणणें असें कीं, जीव व ब्रम्ह एक नाहींत. ह्यावरून दोघां वादींपैकीं एकाचें ज्ञान खोटें असलें पाहिजे हें तर उघडच आहे. कोणाचें ज्ञान खरें किंवा दोघांचेंही ज्ञान खोटें हें अनुभवा-वांचून ठरणार नाहीं. हे दोघे निरनिराळे मतवादी किंवा त्यांपैकीं एक मतवादी आपल्या ज्ञानानें मुक्तीस पोंचला किंवा नाहीं हें त्यांचे त्यांना माहीत. ह्यावरून कोणी अशी शंका करील कीं, पृथ्वीवर जीव व ईश्वर ह्यांच्या संबंधीं जितकीं निरनिराळीं मतें आहेत त्यांपैकीं सत्य मत एकच असलें पाहिजे; असें जर आहे तर त्या सत्य मताचे

लोक मुक्तीस गेले पाहिजेत व बाकीच्या मतांचे लोक नरकांत पडले पाहिजेत; तर असें आहे कीं काय? येथें हें लक्षांत ठेवावें कीं, प्रत्येक धर्माला खरा ह्मणणारे असे त्या धर्माचेच लोक असून बाकी सर्व धर्मांचे लोक त्याचे विरुद्ध आहेत. आतां ह्या शंकेच्या समाधानाविषयीं विचार येथें न करितां दुसऱ्या प्रसंगीं करण्यांत येईल.

मराठी, कानडी, तेलंगी, गुजराथी, हिंदुस्थानी, उर्दू, इत्यादि भाषेंत अद्वैत व द्वैत मतांवर पुष्कळ ग्रंथ आहेत. परंतु शंकराचार्य व मध्वाचार्य ह्यांच्या ग्रंथांपुढें त्यांचें कांहीं महत्व नसल्यामुळें त्या किरकोळ ग्रंथांच्या संबंधानें विचार करण्याचें कारण नाहीं.

जो पाप करितो त्याला शासन होण्याकरितां परमेश्वर नरकांत टाकितो. ह्यावरून कोणी अशी शंका घेईल कीं, नरकांत टाकिलें असतां नरकांत पडणाऱ्याला जें दुःख होतें त्याचा अनुभव परमेश्वराला असला पाहिजे, आणि असा अनुभव येण्याला परमेश्वरही खुद्द नरकांत पडून त्यानेंही दुःखाचा अनुभव घेतलेला पाहिजे. तर ह्या शंकेचें समाधान असें आहे कीं, परमेश्वर हा सर्वज्ञ आहे, ह्मणून त्याला भविष्यज्ञानही आहे, ह्मणजे पुढें घडणारी जी गोष्ट ती आज घडत नसूनही तिचें ज्ञान आज त्यास आहे, म्हणून कोणी जीव नरकांत पडल्यावर त्याला तेणेंकरून किती दुःख होईल ह्याचें ज्ञान ती गोष्ट न घडतां आज परमेश्वरास असलें पाहिजे हें उघड आहे.

वर सांगितल्याप्रमाणें सृष्टीविषयीं व सृष्टीच्या कर्त्याविषयीं नेहमीं योग्य प्रकारें विचार करून, वेदांत ग्रंथांचें योग्य गुरुजवळ अध्ययन करून, साधूंच्या संगतीनें सदाचरणानें वागून, परमेश्वराचें यथार्थ ज्ञान मिळवून त्याची उत्तम प्रकारें भक्ति करून कृपा मिळवावी, ह्मणजे जीव जन्ममरणरूप प्रपंचांतून मुक्त होऊन परमेश्वराजवळ जाऊन उत्तम प्रकारचे आनंद अनुभवतो.

ब्रम्हवल्लीप्रतिपाद्यो विषयः

(अद्वैतमते)

ब्रह्मविद्याप्राप्त्युपसर्गशमनार्थं शांतिः पठिता । तत्र एतदुच्यते ब्रह्म-विद् परंब्रह्म प्राप्नोति । यः सत्यज्ञानानंतस्वरूपं ब्रम्ह जानाति स सर्वज्ञब्रह्मणा आत्मस्वरूपेण सर्वान् निर्विशेषान् कामान् समश्नुते । तस्मा-द्ब्रह्मणः सकाशादाकाशं शब्दगुणमुत्पन्नमाकाशाद् द्विगुणो वायुर्वायोस्त्रिगु-णोऽग्निरग्नेश्चतुर्गुणा आपोद्भ्यः पंचगुणा पृथिवीत्येवं क्रमेण समुत्पन्नानि-भूतानि पृथिव्या ओषधयस्ततोऽन्नमन्नात्पुरुषः समजायत ॥

अत्र शरीरेऽन्नमयप्राणमयमनोमयविज्ञानमयानंदमयाख्याः पंच कोशाः विद्यंते । तत्रान्नमयस्य दृश्यमानं शिरः। दक्षिणो बाहुर्दक्षिणः पक्षः । सव्यो बाहुः सव्यः पक्षः । देहस्य मध्यभागो मध्यांगं । अधरांगं पुच्छमिव । प्राणमयोऽपि पुरुषाकृतिस्तस्य प्राणवायुः शिरस्थाने । व्यानो दक्षिणः पक्षः । अपान उत्तरः पक्षः । आकाशो मध्यांगं । पृथिवी पुच्छमिव । मनोमयस्य शिरस्थाने यजुर्वेदः । ऋग्वेदो दक्षिणः पक्षः । सामवेद उत्तरः पक्षः । ब्राह्मण आत्मा । अथर्ववेदः पुच्छमिवेयमपि पुरुषाकृतिः। विज्ञानमयस्य शिरस्थाने श्रद्धा । यथाशास्त्रं बुद्धौ निश्चितोऽर्थो दक्षिणः पक्षः । सत्यं उत्तरः पक्षः । समाधानं मध्यांगं । महत्तत्वं पुच्छमिवेत्ययं पुरुषाकृतिः ॥ आनंदमयोऽपि पुरुषाकृतिः । आनंदमयस्य इष्टदर्शन-निमित्तानंदः शिरस्थाने । प्रियलाभनिमित्तो हर्षो दक्षिणः पक्षः । प्रकृष्टो हर्ष उत्तरः पक्षः । सुखसामान्यं मध्यांगं । परंब्रम्ह पुच्छमिव । अथैनं श्रुत्वा शिष्यप्रश्नः अविद्वान्मरणोत्तरं ब्रम्ह प्राप्नोति न वा विद्वान्मरणोत्तरं ब्रम्ह प्राप्नोति न वा तत्राविद्वान् ब्रम्ह नाप्नोति विद्वान् समश्नुत इत्येत-त्प्रतिपादनायोत्तरग्रंथः ॥

ब्रह्म नामरूपाभिव्यक्त्योत्पद्येयेति कामयांचक्रे । ततः सर्वजगत्सृष्टिं कृत्वा तत्र प्रविवेश । ब्रम्ह आनंदकरं तदेव धर्मानुरूपं सर्वेभ्यः सुखं ददाति । यः साधको निर्विकारे निराधारे ब्रह्मणि अहं ब्रह्मैवास्मीत्येवमैक्यं

चिंतयति स निर्भयो भवति ॥ब्रम्हणः सकाशाद्भिन्नोऽहमिति यो जानाति स भयं प्राप्नोति ॥ ब्रह्मणो भयेन वायुसूर्याग्नींद्रमृत्यवः स्वस्वकार्याणि कुर्वंति ॥

अथानंदविचारः । यः सार्वभौमो राजा शरीरसंपद्या परिपूर्णः सर्व-भोगपरिपूर्णः शत्रुरहितस्तस्य य आनंदः ततः शतगुणो मनुष्यगंधर्वाणा-मानंदः। ततः शतगुणो देवगंधर्वाणामानंदः । ततः शतगुणं पितृणामानंदः। ततः शतगुण आजानजानां देवानामानंदः । ततः शतगुणः कर्मदेवानामा-नंदः । ततः शतगुणो देवानामानंदः । ततः शतगुणः इंद्रस्यानंदः। ततः शतगुणो बृहस्पतेरानंदः । ततः शतगुणो विराट्संज्ञकस्य ब्रह्मणः आनंदः। ततः शतगुणो हिरण्यगर्भस्यानंदः ॥

य आकाशादिकार्यं सृष्ट्वा मनुष्ये प्रविष्टो यश्च सूर्ये तावुभावभिन्नौ । एवं ज्ञान्यन्नमयप्राणमयमनोमयविज्ञानमयानंदमयान् सम्यक् जानाति यस्मादानंदस्वरूपब्रम्हणः सकाशाद्वाचो मनसा सह निवर्तंते तदानंद-स्वरूपं ब्रम्ह ज्ञात्वा कुतश्च न बिभेति । य एवं जानाति स पुण्यपापं परमात्माभिन्नं पश्यतीत्येवमत्रात्यंतं रहस्यं दर्शितं ॥

ब्रम्हवल्लींतील विषय.

(अद्वैतमतानें)

ब्रह्माचें ज्ञान प्राप्त करून घेतांना विघ्न न येण्याकरितां प्रथम शांति- पाठ ह्मणून नंतर पुढील विषय सांगितला आहे. ब्रह्माला जाणणा- ऱ्यास उत्कृष्ट ब्रम्हाची प्राप्ति होते. जो सत्य, ज्ञानरूप, व अनंत अशा ब्रम्हाला जाणतो तो, सर्वज्ञ जें ब्रह्म तद्रूप होऊन सर्व (भेदरहित अशा) इष्ट सुखांचा उपभोग घेतो. त्या ब्रम्हापासून शब्दगुणानें युक्त असें आकाश उत्पन्न झालें. आकाशापासून, शब्द व स्पर्श ह्या दोन गुणांनीं युक्त असा वायु उत्पन्न झाला. वायूपासून, शब्द, स्पर्श व रूप ह्या तीन गुणांनीं युक्त असा अग्नि उत्पन्न झाला. अग्नीपासून, शब्द स्पर्श रूप व रस ह्या चार गुणांनीं युक्त असें उदक उत्पन्न झालें. उदकापासून, शब्द स्पर्श रूप रस व गंध ह्या पांच गुणांनीं युक्त अशी पृथ्वी उत्पन्न झाली. ह्याप्रमाणें पंच महाभूतें क्रमानें उत्पन्न झालीं. पृथ्वीपासून वनस्पति उत्पन्न झाल्या. वनस्पतींपासून अन्न उ- त्पन्न झालें. अन्नापासून मनुष्य उत्पन्न झाला. मनुष्याचे शरीरांत अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, व आनंदमय असे पांच कोश आहेत. मनुष्याची जी आकृति तीच अन्नमयकोशाची आकृति आहे; जें डोकें दिसतें तेंच त्या कोशाचें डोकें आहे; उजवा हात त्याची उजवी बाजू आहे; डावा हात त्याची डावी बाजू आहे; मनुष्याचा मध्यभाग हा त्याचें मध्य अंग आहे; व खालचें अंग जणू त्याचें शेंपूट आहे. अन्नमयकोशाचे आंत असलेल्या प्राणमयकोशाची आकृतिही मनुष्याच्या आकृतीसारखीच आहे; प्राणवायु हा त्या प्राणमय- कोशाचें डोकें आहे; व्यान हा त्याची उजवी बाजू आहे; अपान हा त्याची डावी बाजू आहे; आकाश हें त्याचें मध्य अंग आहे; व पृथ्वी जणू त्याचें शेंपूट आहे; असें कल्पिलें आहे. प्राणमयकोशाचे आंत असलेल्या मनोमयकोशाची आकृति मनुष्याच्या आकृतीप्रमाणेंच आहे;

यजुर्वेद हा त्या मनोमयकोशाचें डोकें आहे; ऋग्वेद हा त्याची उजवी बाजू आहे; सामवेद हा त्याची डावी बाजू आहे; वेदाचा ब्राह्मण भाग हा त्याचें मध्य अंग आहे; व अथर्व वेद जणू त्याचें शेंपूट आहे. मनोमयकोशाचे आंत असलेल्या विज्ञानमयकोशाची आकृतीही मनुष्याच्या आकृतीप्रमाणेंच आहे; श्रद्धा ही त्याचें डोकें आहे; ऋत (म्हणजे शास्त्राप्रमाणें बुद्धीनें निश्चित केलेला अर्थ) हा त्याची उजवी बाजू आहे; सत्य (म्हणजे शरीरानें, मनानें व वाणीनें केलेलें कार्य) हें त्याची डावी बाजू आहे; समाधि ही त्याचें मध्य अंग आहे; महत्तत्व हें जणू त्याचें शेंपूट आहे; असें कल्पिलें आहे. विज्ञानमयकोशाच्या आंत असलेल्या आनंदमयकोशाची आकृतीही मनुष्याच्या आकृतीप्रमाणेंच आहे; प्रिय (ह्मणजे पुत्रादिक इष्टदर्शनापासून झालेला आनंद) हें त्याचें डोकें आहे; मोद (ह्मणजे इष्ट वस्तु मिळाल्यानें होणारा हर्ष) हा त्याची उजवी बाजू आहे; प्रमोद (ह्मणजे उत्कृष्ट हर्ष) हा त्याची डावी बाजू आहे; आनंद हा त्याचें मध्य अंग आहे; परब्रम्ह हें जणू त्याचें शेंपूट आहे; असें कल्पिलें आहे. ह्याप्रमाणें ऐकून शिष्य गुरूला असे प्रश्न विचारतो कीं, अज्ञानी मनुष्य मेल्यावर ब्रह्माकडे जातो किंवा नाहीं? आणखी ज्ञानी मनुष्य मेल्यावर त्यास ब्रम्ह प्राप्त होतें किंवा नाहीं? तेव्हां अज्ञान्यास ब्रह्म प्राप्त होत नाहीं व ज्ञान्यासच प्राप्त होतें असें उत्तर ह्या पुढील ग्रंथांत दिलें आहे.

परब्रम्हाला असें वाटलें कीं, माझीं नामें व रूपें स्पष्ट होऊन मीं उत्पन्न व्हावें. असें वाटल्यावर त्यानें सर्व जगत उत्पन्न करून त्यांत प्रवेश केला. ब्रह्म हें आनंदाचें कारण आहे. तेंच ब्रह्म लोकांना आपआपल्या पुण्याप्रमाणें सुख देतें. जो कोणी साधन करणारा विकाररहित व ज्यास आधार नाहीं असें जें ब्रह्म तें व मीं एक आहोंत असें चिंतन करितो तो भयरहित होतो. ब्रह्माहून मी निराळा आहें असें जो समजतो त्यास भय प्राप्त होतें. ब्रम्हाच्याच भयानें वायु, सूर्य, अग्नि, इंद्र व मृत्यु हे आपआपलीं कामें करितात.

ह्यापुढें आनंदाविषयीं विचार केला आहे तो येणेंप्रमाणें:—जो सार्वभौम राजा शरीरसंपत्तीनें सदृढ, उपभोगाच्या साधनांनीं परिपूर्ण व

शत्रुरहित, असा आहे त्यास जो आनंद होतो त्याच्या शंभरपट आनंद मनुष्यगंधर्वांना होतो. मनुष्यगंधर्वांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद देवगंधर्वांनां होतो. देवगंधर्वांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद पितरांना होतो. पितरांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद आजानज (म्ह० देवविशेष) ह्यांना होतो. आजानजांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद कर्मदेवांना होतो. कर्मदेवांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद देवांनां होतो. देवांच्या आनंदाच्या शंभरपट आनंद इंद्रास होतो. इंद्राच्या आनंदाच्या शंभरपट आनंद ब्रृहस्पतीस होतो. ब्रृहस्पतीच्या आनंदाच्या शंभरपट आनंद विराटनामक ब्रह्मदेवाला होतो. विराटनामक ब्रह्मदेवाच्या आनंदाच्या शंभरपट आनंद हिरण्यगर्भनामक ब्रम्हदेवाला होतो.

ज्यानें आकाशादिक सृष्टि उत्पन्न करून त्यांत प्रवेश केला आहे तो, व जो सूर्यांत आहे तो, हे दोघे एकच आहेत. असें जो जाणतो तो अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय हे पांच कोश उत्तम प्रकारें जाणतो. ज्या आनंदरूप ब्रम्हापासून मनासहवर्तमान वाणी परततात तें ब्रम्ह जो जाणतो त्यास कशाचेंही भय वाटत नाहीं. जो असें जाणतो तो पुण्य व पाप हीं ब्रम्हाहून निराळीं नाहींत असें समजतो. येणेंप्रमाणें ह्या उपनिषदांत कथन केलें आहे.

ब्रम्हवल्लीप्रतिपाद्यो विषयः

(द्वैतमते)

ब्रह्मविद्यां वक्तुं मध्यागतविघ्नपरिहाराय ब्रह्मा शांतिं पठति । तत इदं प्रतिपाद्यते । परब्रह्मवित् परं ब्रह्माप्नोति । तत्परंब्रह्म किं लक्षणकं । कुत्र च तद्वेदनं किं हृदि तदन्यत्र वा । का च तत्प्राप्तिः किं तदैक्याप-त्तिरूपा तत्समीपं प्राप्य भोगानुभवरूपा वा । एतच्छंकात्रयं प्रति तदु-त्तरत्वेन ऋक्मंत्रवर्णरूपा सत्यमित्यादिना विपश्चितेत्यंतेन उक्ता । तत्राद्यप्रश्नोत्तरं सत्यंज्ञानमनंतंब्रह्मेति ब्रह्मणो लक्षणं । योऽधिकारी हृद-यगुहायां दहराकाशे निहितं सत्यत्वादिविशिष्टं परं ब्रह्म वेद स ब्रह्मविद-धिकारी स्वयोग्यानंदादीन् विरिंचेन परब्रह्मणा वा सह भुंक्त इति द्विती-यतृतीयप्रश्नयोरुत्तरं ॥

अथ सृष्टिप्रकारः । परमात्मन आकाशः समुत्पन्नः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधी-भ्योऽन्नं । अन्नात्पुरुषः । अत्र आकाशादिपुरुषांतशब्दैर्भूतं भूताभि-मानी भूताभिमानिनो देहस्तदंतर्नियामको हरिश्चेति चत्वारश्चत्वारो ग्राह्याः। जीवस्य दृश्यमाने शरीरे स्थिते योऽनिरुद्धनामको भगवान् स अन्नमयः। तस्मिन्ननिरुद्धनामके परमात्मनि प्रद्युम्ननामको यो भगवान् विद्यते सः प्राणमयः । तस्मिन् प्रद्युम्ननामके परमात्मनि यः संकर्षणनामको भगवान् विद्यते स मनोमयः । तस्मिन् संकर्षणनामके परमात्मनि यो वासुदेवनामको भगवान् स विज्ञानमयः । तस्मिन् वासुदेवनामके परमा-त्मनि यो नारायणनामा भगवान् स आनंदमयः । एवमन्नमयादीनां पंचानामपि ब्रम्हत्वमेव न जीवत्वं ॥

अज्ञानिनो ब्रह्म नैवाप्नुवंति ज्ञानिनएव ब्रह्माप्नुवंति । तत्राप्यखिलापि ज्ञानिनो ब्रह्माप्नुवंति न केचिदेव । तत्रापि सर्वे ज्ञानिनो न सम्यक् ब्रह्म समाप्नुयुः । किंतु सम्यक् प्राप्तिर्विरिंचस्यैव सर्वदा अन्येषां तारतम्येन त-त्प्राप्तिः । इदानीं ब्रह्मज्ञान्येवैतदवाप्नुत इत्युक्तं तत्र ब्रह्मज्ञानं नाम कीदृशं

विवक्षितमिति शंकायां जगत्स्रष्टत्वतत्प्रविष्टत्वसर्वदेवादिभयप्रदत्वमुक्तिदत्वादिना रूपेण ज्ञानमेव ब्रह्मज्ञानं विवक्षितं ॥

अथ ब्रह्मणः सृष्टिकारणत्वरूपं माहात्म्यमुच्यते । प्रलयकालगो नारायणोऽहमादौ वासुदेवादिरूपेण प्रादुर्भवामि नियम्यं जगच्च स्यात् तदनंतरं सदादिशब्दवाच्यश्री ब्रह्मादिजगन्नियामकतयाऽहं बहुरूपः स्यामित्यकामयत । अनंतरं सः प्रलयकालगो नारायणः स्वोदरस्थं जगद्ददर्श। स्वोदरस्थं जगदृष्ट्वा वासुदेवादिरूपोऽभवत् ।अनंतरमवांतरविशेषवदकरोत्॥

अधुना ब्रह्मणे जगत्प्रविष्टत्वमाहात्म्यं वर्ण्यते । जगन्नियामकतया स्वयमप्यनिरुद्धादिबहुरूपो भूत्वा सृष्टं जगदनुप्राविशत । परमात्मा प्रकृतिचतुर्मुखप्राणाख्यजगति स्थित्वा ततत्वे सति नियामकत्वाऽवाच्यत्वसर्वाधारत्वसर्वविज्ञानसाधुगुणस्वरूपनिमित्तैः । प्रकृत्यादिगततत्वादिप्ररकतया मुख्यतः सदादिशब्दवाच्योऽभवत् । सुवाच्यत्वान्निरुक्तं दौर्बल्येन सर्वाधारत्वाभावादनिलयनं असर्वज्ञत्वादविज्ञानं असाधुत्वादनृतं यज्जगत् तदंतर्गतो हरिरेव सदादिशब्दवाच्योऽभवत् सर्वत्र स्थितो हरिर्मंगलस्वरूपएव न तत्तल्लेपवान्॥

यदा एषोऽधिकारी अज्ञदृष्ट्यगोचरे जीवसंबध्यल्पज्ञानाल्पसुखादिरहिते साकल्येन वेदाप्रतिपाद्ये अपराश्रये निर्भयं यथास्यात्तथाऽपरोक्षज्ञानस्य स्थितिं लभते तदा अभयं हरिं मुक्त्या प्राप्नोति । यः जीवेषु युगपदनेकस्थानत्वेन भेददर्शनात् तदृष्टांतेन एतस्मिन् विष्णौ विश्वतैजसादिभगवद्रूपसमुदायेपि युगपत् दक्षिणाक्ष्यादिस्थानभेदेन भेदं अनुमिनोति तस्य तमआख्यं भयंकरं स्थानं भवति त्रैविद्यसंज्ञकस्य नित्यसंसारिरूपविदुषस्तदेवब्रह्मसंसारपरिवृत्तिलक्षणभयप्रदं भवति ।

भगवतो भयेन वातो भूततदभिमानी प्रवहः तृणपर्णादिसंमार्जनेन भूशुद्धिं करोति । तस्य भयेन सूर्य उदितो भूत्वा ध्वांतं विना पदार्थान् प्रकाशयति । तस्य भयेनाग्निश्चेंद्रश्चेत्युभौ पचनवर्षणरूपस्वस्वव्यापारं कुरुतः । तस्य भयेन च यमः प्रजासंयमनादिरूपे स्वव्यापारे धावति । एवं सर्वेपि देवा भगवतो भयेन स्वव्यापारान् कुर्वंति ॥

इदानीं ब्रम्हणस्तारतम्येन मुक्तानंदप्रदत्वमाहात्म्यं कथ्यते । यः पूर्वत्रेतायुगे वित्तपरिपूर्णपृथिवीपतिः भगवत्सामीप्यलक्षणं मोक्षवान् दुःखासंभिन्नत्वानित्यत्वादिदोषरहितैरानंदाद्यैर्गुणैर्युक्तः अधीति फलसंपूर्णः अतिशयेन निर्विकारः अतिशयेन बली स्यात् तस्य यावानानंदोऽस्ति तावानेव

मानुषआनंद एको ग्राह्यः । मानुषाणां ये शतसंख्याका आनंदाः तत्समाना मनुष्यगंधर्वाणामानंदाः । मनुष्यगंधर्वाणां ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः देवगंधर्वाणामानंदाः । देवगंधर्वाणां ये शतसंख्याकाआनंदाः तत्समानाः पितॄणामानंदाः । पितॄणां ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः आजानजानामानंदाः । आजानजानां ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः कर्मदेवानामानंदाः । कर्मदेवानां ये शतसंख्याका आनंदाः । तत्समानाः तात्विकानां देवानामानंदाः । तात्विकानां ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः दक्षस्यानंदाः । दक्षस्य ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः इंद्रस्यानंदाः। इंद्रस्य ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः रुद्रस्यानंदाः । रुद्रस्य ये शतसंख्याका आनंदाः तत्समानाः चतुर्मुखब्रम्हण आनंदाः ॥

यो मनुष्यादिअपकृष्टजीवेषु नियामकतया तिष्ठति यश्च आदित्याद्युत्कृष्टजीवेषु देवेषु नियामकतया तिष्ठति सः ब्रह्मादीनां स्वरूपानंदावाप्तिदाता विष्णुरेकएव । न तयोः परस्परं भेदो मंतव्यः । यः सर्वरूपेष्वभेदादिरूपभगवन्माहात्म्यस्य वेत्ता तथा नरादिब्रह्मांतानां भगवत्प्रसादादाविर्भूततरतमभावोपेतानंदस्य वेत्ता सः भोगेन प्रारब्धकर्मक्षपयित्वाऽनंतरं अस्माच्चरमत्वेन प्रसिद्धाच्छरीरात् हृदयाग्रज्वलनप्रकाशितनाडीद्वारा निष्क्रम्यार्चिरादिद्वारा यथायोग्यं कार्यमकार्यं च ब्रह्म प्राप्यावस्थितःसन् कार्यात्ययेध्यक्षेण ब्रह्मणासह अन्नमयनामकस्य भूम्यपगस्यानिरुद्धस्य समीपं गच्छति । अग्न्यादिषु स्थितस्य प्रद्युम्नस्य समीपं गच्छति । मनस्तत्वादिसंस्थस्य संकर्षणस्य समीपं गच्छति । महति स्थितस्य वासुदेवस्य समीपं गच्छति । अव्यक्तगतस्य नारायणस्य समीपं गच्छति । एवं पंचरूपिणं भगवंतं प्राप्य संसारभयरहितः सन् तिष्ठति ॥

अहं साधुकर्म नाकार्षं किं अहं पापं अकरवं किं येनैतादृशं पापफलं भुंजे इत्येवं रूपं पश्चात्तापजनितं भयं एतं मुक्तं न संतापयति।इदानीं प्रारब्धकर्मणां भोगेन क्षयेपि पूर्वार्जितानामप्रारब्धानां पुण्यपापरूपाणामनंतकर्मणां भावात् तेषां भोगेन न क्षयाच्च ज्ञानिनः कथं भगवत्प्राप्तिरिति न वक्तव्यं ।

यः उक्तप्रकारेण परमात्मापरोक्षज्ञानी सः अनिष्टं अप्रारब्धं यत्काम्यं पुण्यं तथाऽप्रारब्धं पापं चेत्येवमेते पुण्यपापे प्रियेष्वप्रियेषु च जहाति। अतः ज्ञानिनो भगवत्प्राप्तिर्युक्ता। एवं वेत्तुरपि तदेव फलं भवति। एवं प्रकारेण वरुणंप्रति तद्योग्यां रहस्यभूतां वा ब्रह्मविद्यां उपदिश्य ब्रह्मा उपसंहरति॥

ब्रह्मवल्लींतील विषय.

(द्वैतमतानें)

ब्रह्मविद्या सांगण्याकरितां मध्यें येणाऱ्या अडचणी दूर करण्यास्तव ब्रह्मदेव प्रथम शांति ह्मणतो. त्यानंतर ब्रह्मविद्या सांगतो ती येणें-प्रमाणें. जो परमात्म्याला जाणतो त्याला परमेश्वराची प्राप्ति होते. आतां त्या परमात्म्याचें लक्षण काय; त्याला कोठें ह्मणजे आपल्या हृदयांत किंवा दुसऱ्या ठिकाणीं जाणावयाचे; व त्याची प्राप्ति ह्मणजे काय तो व आपण एक होणें किंवा त्याच्याजवळ जाऊन आनंदाचा उपभोग घेत राहणें, ह्या तीन शंकांचीं उत्तरें देण्याकरितां " सत्यं " येथून " विपश्चिता " येथपर्यंतचा ऋङ्मंत्र उपनिषदाच्या मुळांत दि-लेला आहे. जें सत्य, ज्ञानस्वरूप, व अनंत आहे तें ब्रह्म [ह्मणजे परमात्मा] आहे हें परमात्म्याचें लक्षण पहिल्या शंकेचें उत्तर होय. जो अधिकारी सत्य इत्यादि गुणांनीं युक्त असलेला परमात्मा आपल्या हृदयांतील लहानशा आकाशांत आहे असें जाणतो तो परमात्मज्ञानी ब्रह्मदेव अथवा परमात्मा ह्याच्या सहवर्तमान आपल्या योग्यतेप्रमाणें आनंदाचा उपभोग घेतो, हें दुसऱ्या व तिसऱ्या शंकांचें उत्तर आहे.

आतां सृष्टि कशी उत्पन्न झाली हें सांगतो. परमात्म्यापासून आ-काश उत्पन्न झालें. आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून उदक, उदकापासून पृथ्वी, पृथ्वीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न, व अन्नापासून मनुष्य, ह्याप्रमाणें सृष्टि उत्पन्न झाली. येथें आकाश, वायु, अग्नि, उदक, पृथ्वी, वनस्पती, व मनुष्य ह्या शब्दांनीं पंचमहाभू-तें, त्यांच्या अभिमानी देवता, त्या देवतांचा देह, व त्या देहांत राहून नियमन करणारा हरी ह्याप्रमाणें च्यार च्यार घ्यावेत. जीवाचें जें शरीर दिसतें त्यांत असलेला अनिरुद्धनामक परमात्म्याचें रूप अन्नमय आहे. त्या अनिरुद्धनामक परमात्म्याच्या रूपांत जें परमात्म्याचें प्रद्युम्न-नामक रूप आहे तें प्राणमय आहे. त्या प्रद्युम्ननामक परमात्म्याच्या रूपांत जें परमात्म्याचें संकर्षणनामक रूप आहे तें मनोमय आहे. त्या

संकर्षणनामक परमात्म्याच्या रूपांत जें परमात्म्याचें वासुदेवनामक रूप आहे तें विज्ञानमय आहे. त्या वासुदेवनामक परमात्म्याच्या रूपांत जें परमात्म्याचें नारायणनामक रूप आहे तें आनंदमय आहे. ह्याप्रमाणें अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, व आनंदमय हीं पांचही ब्रह्माचींच रूपें असून जीवाचीं रूपें नव्हेत.

जे अज्ञानी आहेत त्यांना परमात्मा प्राप्त होत नाहीं, तर तो ज्ञात्यानांच प्राप्त होतो. ज्ञान्यांना परमात्मा प्राप्त होतो तो सर्व ज्ञान्यांना प्राप्त होतो, त्यामध्यें अमुक्यासच प्राप्त होतो असें नाहीं. ज्ञान्यांत तरी सर्वांना परमात्मा उत्तम प्रकारें प्राप्त होतो असें नाहीं, तर परमात्म्याची नेहमीं उत्तम प्रकारची प्राप्ति ब्रह्मदेवालाच होते, दुसऱ्यांना आपआपल्या योग्यतेप्रमाणें प्राप्ति होते. आतां ज्यांना परमात्म्याचें ज्ञान झालें आहे त्यांनाच तो प्राप्त होतो असें सांगितलें, तर परमात्म्याचें ज्ञान कोणत्या प्रकारचें व्हावें अशी शंका आल्यास, जग उत्पन्न करणें, त्यांत प्रवेश करणें, सर्व देवादिकांना आपल्या धाकांत ठेवणें व मुक्ति देणें इत्यादिक परमेश्वराचे गुण जाणणें हेंच परमात्म्याचें ज्ञान असें समजावें.

आतां परमात्म्याचें जगत उत्पन्न करण्याचें माहात्म्य सांगतो. प्रलयकालीं नारायणानें अशी इच्छा केली कीं, पहिल्यानें आपण वासुदेव इत्यादि रूपांनीं प्रगट व्हावें व नियमन करण्याजोगे जगत आपणास असावें, व त्यानंतर लक्ष्मी ब्रह्मदेव इत्यादिक जगताचे नियमन करण्यानें आपण बहुत रूपें धारण करावीत. नंतर त्या प्रलयकालच्या नारायणानें आपल्या पोटांतून जगत (कोष्टी किड्याप्रमाणें) उत्पन्न केलें, जगत उत्पन्न करून वासुदेव इत्यादि रूपें धारण केलीं. नंतर अवांतर पदार्थ उत्पन्न केले.

आतां परमात्म्याचें जगतांत प्रवेश करण्याचें माहात्म्य सांगतो. जगताचें नियमन करण्याकरितां परमात्म्यानें स्वतःही अनिरुद्ध इत्यादिक अनेक रूपें धारण करून सृष्टींत प्रवेश केला. लक्ष्मी, ब्रह्मदेव, मुख्य प्राण ह्यांच्यामध्यें सर्वांत व्याप्त असून त्यांचें नियमन करणें, शब्दांनीं वर्णन करण्याजोगें नसणें, सर्वांचा आश्रय असणें, सर्व जाणणें, सर्व चांगले गुण आपणामध्यें असणें, हे गुण आहेत. लक्ष्मी इत्यादिकांच्या ठिकाणीं परमात्मा राहून ह्या गुणांचें नियमन करीत अस.

ह्यामुळें त्यन्, अनिरुक्त, निलयन, विज्ञान, सत्, हे शब्द मुख्यत्वेंकरून परमात्म्यास लागू झाले. सहज वर्णनीय असल्यामुळें निरुक्त, दुर्बळतेच्या कारणानें सर्वांचा आधार नसण्यामुळें अनिलयन, सर्व न जाणण्यामुळें अविज्ञान, चांगलें नसण्यामुळें अनृत, असें जें जगत त्यांत असलेला परमात्माच सत् इत्यादि शब्दांनीं वाच्य झाला. सर्वत्र ठिकाणीं असलेल्या परमात्म्यास अमंगल पदार्थांचा लेप नसून तो मंगलस्वरूपच आहे.

जेव्हां कोणी योग्य मनुष्यास, अज्ञानी लोकांस न दिसणारा, जीवाचे अल्पज्ञान व अल्पसुख ह्यांनीं रहित, वेद ज्याचे पूर्णपणें वर्णन करूं शकत नाहींत, ज्यास दुसऱ्याचा आश्रय नाहीं, अशा परमेश्वराचें ज्ञान खात्रीनें होतें, तेव्हां त्यास मुक्ति होऊन तो भयरहित परमात्म्याजवळ जातो. जीव एकच वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं राहात असल्यामुळें जसे ते परस्पराहून भिन्न आहेत, तसे विश्वतैजस इत्यादि हीं परमात्म्याचीं रूपें एकाच वेळीं अनुक्रमें उजवा डोळा गळा इत्यादि ठिकाणीं राहात असल्यामुळें तीं परस्पराहून भिन्न आहेत असें जो जाणतो त्यास अंधंतमनामक भयंकर नरक प्राप्त होतो. तिन्ही वेद पढून संशयांत राहाणारे अशा त्रैविद्यसंज्ञक लोकांस तोच परमात्मा संसारभयांत ठेवितो. परमात्म्याच्या भयानें वारा व त्याची अभिमानी देवता प्रवह हे कचरा काढून पृथ्वी साफ करितात. त्याच्याच भयानें सूर्य उगवून अंधार नाहींसा करून सर्व पदार्थांना प्रकाशित करितो. त्याच्याच भयानें अग्नि व इंद्र हे दोघे अनुक्रमें पाचन व वर्षण हे व्यापार करितात. आणखी त्याच्याच भयानें यम लोकांचें नियमन करण्याला प्रवृत्त होतो. ह्याप्रमाणें परमात्म्याच्या भयानें सर्वही देव आपले व्यापार करितात.

आतां परमात्म्याचे दुसऱ्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें आनंदरूप मुक्ति देण्याचें माहात्म्य सांगतो. त्रेतायुगांत संपत्तीनें भरलेल्या पृथ्वीचा राजा असून परमात्म्याच्या जवळ असणें अशी मुक्ति मिळालेला, ज्यांत दुःखाचा लेश नसून अशाश्वतपणा इत्यादि दोष नाहींत अशा प्रकारचे आनंद इत्यादि गुणांनीं युक्त, अध्ययनाचें फळ ज्यास पूर्णपणें मिळालें आहे, ज्यास कशानेंही विकार होत नाहीं, अतिशय बळकट, अशा

मनुष्यास जेवढा आनंद असतो तेवढा आनंद, इतर आनंद मोजण्याचें एक माप आहे अशी कल्पना केली, तर मनुष्याचे असे जे शंभर आनंद ते सर्व मिळून मनुष्यगंधर्वांचा एक आनंद होतो. मनुष्यगंधर्वांचे जे शंभर आनंद ते मिळून देवगंधर्वांचा एक आनंद होतो. देवगंधर्वांचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून पितरांचा एक आनंद होतो. पितरांचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून आजानज देवांचा एक आनंद होतो. आजानज देवांचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून कर्मदेवांचा एक आनंद होतो. कर्मदेवांचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून तात्विकदेवांचा एक आनंद होतो. तात्विकदेवांचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून दक्षाचा एक आनंद होतो. दक्षाचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून इंद्राचा एक आनंद होतो. इंद्राचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून रुद्राचा एक आनंद होतो. रुद्राचे जे शंभर आनंद ते सर्व मिळून ब्रह्मदेवाचा एक आनंद होतो.

मनुष्यें इत्यादिक कनिष्ठ जीवांमध्यें जो नियमन करणारा आहे व जो सूर्य इत्यादि श्रेष्ठ जीवांमध्यें जो नियमन करणारा आहे, हे दोघेही एकच असून ब्रह्मदेव इत्यादिकांना स्वरूपानंदरूप मुक्ति देणारा असा विष्णूच आहे. परमात्म्याचे सर्व रूपांमध्यें अभेद आहे असें जो जाणतो, व तसेंच मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत परमात्म्याच्या प्रसादानेंच त्यांच्या योग्यतेनुसार आनंद त्यास प्राप्त होतो असें जाणतो, तो प्रारब्ध कर्मे उपभोगानें संपवून ह्या शेवटच्या देहांतून हृदयाच्या टोंकाजवळील ज्योतीच्या प्रकाशानें सुषुम्ना नाडीच्या द्वारानें बाहेर निघून आर्चिरादिक मार्गानें आपल्या योग्यतेनुसार ब्रह्मदेव अथवा परमात्मा ह्यांजकडे जाऊन व तेथें राहून प्रलयकालीं ब्रह्मदेवासहवर्त्तमान अन्नमयनामाच्या पृथ्वी व उदक ह्यांच्यामध्यें असलेल्या अनिरुद्धाच्या जवळ जातो; अग्नि इत्यादि ह्यांच्यामध्यें असलेल्या प्रद्युम्नाच्या जवळ जातो; मन इत्यादि ह्यांच्यामध्यें असलेल्या संकर्षणाच्या जवळ जातो; महत्तत्वामध्यें असलेल्या वासुदेवाजवळ जातो; प्रकृतीमध्यें असलेल्या नारायणा जवळ जातो. ह्याप्रमाणें परमात्म्याच्या पांची रूपांचें प्रत्यक्ष दर्शन होऊन संसारभयरहित होऊन राहातो.

मीं पुण्य केलें नाहीं काय, मीं पाप केलें आहे काय, आणि तणें-

करून मला वाईट फळ प्राप्त झालें काय, अशा प्रकारच्या पश्चात्तापानें उत्पन्न होणारी भीति मुक्त मनुष्याला संतप्त करीत नाहीं. आतां जर अशी शंका येईल कीं, जरी उपभोगानें प्रारब्धकर्मांचा क्षय झाला तरी पूर्वी संपादिलेली अप्रारब्ध अशीं पुण्यें व पापें अनंत असल्यामुळें, व त्यांचा उपभोगानें नाश होण्याचा संभव नसल्यामुळें, ज्ञान्याला परमात्मा कसा प्राप्त होईल, तर असें मनांत आणूं नये. जो येथें सांगितल्याप्रमाणें परमात्म्यास प्रत्यक्ष जाणतो, त्या ज्ञान्याचें अनिष्ट व अप्रारब्ध असें पुण्य, व पूर्वसंचित पाप, हीं दोन्हीं अनुक्रमें त्याचे मित्र व शत्रु ह्यांजकडे जातात, ह्मणून ज्ञान्याला परमात्मा प्राप्त होणें योग्य आहे. ह्याप्रमाणें जाणणाऱ्यासही तसेंच फळ प्राप्त होतें. ह्याप्रकारें वरुणाला गुप्त ब्रह्मविद्या (किंवा त्याला योग्य अशी ब्रह्मविद्या) सांगून ब्रह्मदेव ग्रंथ संपवितो.

तैत्तिरीयोपनिषत्.

ब्रह्मवल्ली.

हरिः ॐ ॥ सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

अद्वैतटीका—श्रीपरब्रह्मणे नमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ वक्ष्यमाणब्रह्मविद्याप्राप्त्युपसर्गोपशमनार्थां शांतिः पठ्यते ॥ सहनाववत्विति ॥ **नौ** शिष्याचार्यौ **सह** एव **अवतु** रक्षतु । **नौ सह भुनक्तु** भोजयतु । **वीर्यं** विद्यानिमित्तं सामर्थ्यं **सह करवावहै** निर्वर्त्तयावहै । **नौ** आवयोः **अधीतं तेजस्वि** अर्थज्ञानयोग्यं **अस्तु । मा विद्विषावहै** विद्वेषं मा आपद्यावहै[1] । **शांतिः शांतिः शांतिः**[2] ॥

अर्थ—श्री परब्रह्माला नमस्कार असो. गुरूला नमस्कार असो. [पुढें जी ब्रह्मविद्या सांगावयाची आहे तिला विघ्नें न येण्याकरितां शांतीचा मंत्र ह्मणतों.] ब्रह्म आह्मां गुरुशिष्यांचें रक्षण बरोबर करो. आह्मां दोघांना ब्रह्मविद्येपासून उत्पन्न होणारे फलाचा भोग बरोबर करवो. विद्येपासून आह्मी दोघे बरोबरच पराक्रम करूं. आमचें दोघांचें अध्ययन चकचकीत (म्ह० अर्थ समजण्याजोगें) असो. गुरुशिष्य ह्यांच्या बेसावधपणानें घडलेल्या अन्यायांपासून द्वेष उत्पन्न न होवो. शांत असो ; शांति असो ; शांति असो.

द्वैतटीका—श्रीवेदव्यासाय नमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ ब्रह्मविद्यां वक्तुं मध्यागतविघ्नपरिहारार्थं वेदपुरुषः शांतिं पठति ॥ सहनाविति ॥ **नौ** गुरुशिष्यौ **सह** एकदैव **अवतु**[3] प्रविशतु आवयोः सन्निधीयतामित्यर्थः[4] ।

---

१ विद्याग्रहणनिमित्तं शिष्यस्याचार्यस्य वा प्रमादकृतादन्यायाद्विद्वेषः प्राप्तस्तच्छमनायेयमाशीः

२ त्रिर्वचनमाध्यात्मिकाधिभौतिकाधिदैविकतापत्रयोपशांतये

३ अवरक्षणगतिकांतिप्रवेश इत्यादि धातुपाठः

४ अथवा सः मित्रादिः नौ गुरुशिष्यौ विघ्नान् परिहृत्य अवतु रक्षतु हेति मित्रादेः रक्षणे सामर्थ्यमस्तीति प्रसिद्धामिति दर्शयति

नौ गुरुशिष्यौ **सह** एव साकमेव **भुनक्तु**[1] अन्नादिदानेन पालयतु[2] व्याख्यानविषये **वीर्यं** सामर्थ्यं **सह करवावहै** साकं आचराव । **तेजस्विनौ** वर्चस्विनौ आवां भवाव । **अधीतं** आवयोः अध्ययनं **अस्तु** फलप्रदमस्तु । यद्वा **नौ** आवाभ्यां **अधीतं** अध्ययनं **तेजस्वि अस्तु** । **मा विद्विषावहै** विद्याग्रहणनिमित्तं शिष्यस्य गुरोर्वा प्रमादकृतापराधात्प्राप्तं विद्वेषं नैव करवाव । **ॐ** ॐ पदवाच्येन विष्णुना **शांतिः** अस्तु **शांतिः** अस्तु **शांतिः** अस्तु[3] ।

अर्थ–लक्ष्मीनारायणास नमस्कार असो. **गुरूला नमस्कार** असो. [ब्रम्हसंबंधीं ज्ञान सांगण्याकारितां मध्यें येणाऱ्या अडचणी दूर करण्यास्तव शांति ह्मणतो.] आम्हां गुरुशिष्यांसन्निध (परमात्मा) एकाच वेळीं येवो ; आम्हां गुरुशिष्यांना (परमात्मा) एकाच वेळीं अन्नादिक देऊन रक्षण करो ; ब्रम्हविद्येच्या व्याख्यानाविषयीं आम्ही उभयतां बरोबरच बळ लावूं ; आम्ही उभयतां वर्चस्वी होऊं ;[4] आम्हां उभयतांचें अध्ययन फल देणारें होवो ; ब्रम्हविद्या शिकण्याच्या संबंधानें शिष्याकडून अथवा गुरूकडून बेसावधपणानें घडणाऱ्या अपराधांपासून जो द्वेष उत्पन्न होतो तो आम्ही उभयतां न करो. ॐ ह्या प्रणवानें सांगितलेल्या परमात्म्याकडून शांति असो, शांति असो, शांति असो.[5]

ॐ ब्रम्हविदाप्नोति परम् ॥ तदेषाऽभ्युक्ता । सत्यं ज्ञानमनन्तं ब्रम्ह ॥ यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् । सोऽश्नुते सर्वान् कामान् सह । ब्रम्हणा विपश्चितेति ॥

---

१ भुजपालनाभ्यवहारयोः

२ व्याख्यानेन जनितमौक्तानंदं भोजयत्विति वा

३ दिव्यांतरिक्षभौमानिष्टनिरासाय शांतिरित्यस्य त्रिरुक्तिः । यद्वा आध्यात्मिकाधिभौतिकाधिदैविकानिष्टनिरासाय त्रिरुक्तिः ॥

४ किंवा आह्मीं केलेलें अध्ययन तेजस्वी असो.

५ शांति असो असें तीनदां म्हणण्याचें कारण स्वर्ग, आकाश आणि भूमि ह्या तिन्हींसंबंधीं किंवा आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक ह्या तिन्हींसंबंधीं अरिष्टें नाहींशीं व्हावींत.

अद्वैतटीका–अशेषोपद्रवबीजस्याज्ञानस्य निवृत्यर्थं विधूतसर्वोपाधिविशेषात्मदर्शनार्थमिदमारभ्यते ॥ ब्रम्हविदिति ॥ **ब्रम्हवित्** बृहत्तमत्वाद्ब्रम्ह वक्ष्यमाणलक्षणं तद्वेत्ति विजानातीति **परं** निरतिशयं ब्रम्ह **आप्नोति** अविद्यया विस्मृतं पुनः प्राप्नोतीत्यर्थः । **सत्यं** यद्रूपेण यन्निश्चितं तद्रूपं न व्यभिचरति तत्सत्यं तादृशं **ज्ञानं** अवबोधस्वरूपं **अनंतं** लौकिकज्ञानवदंतवत्वरहितं **ब्रम्ह यः गुहायां** बुद्धौ **परमे** प्रकृष्टे **व्योमन्** व्योम्नि अव्याकृताख्ये आकाशे **निहितं** स्थितं **वेद** विजानाति **सः विपश्चिता** मेधाविना सर्वज्ञेनेतियावत् **ब्रम्हणा** ब्रम्हस्वरूपेण **सर्वान्** निर्विशेषान् **कामान्** भोगान् **सह** युगपत् **अश्नुते** भुंक्ते **इति** तत् तस्मिन्नेव ब्राम्हणवाक्योक्तेर्थे एषा ऋक् अभ्युक्ता आम्नाता ॥

अर्थ–[सर्व उपद्रवाचें मूळ जें अज्ञान तें घालविण्याकरितां आणि निरुपाधिक आत्म्याचें ज्ञान होण्याकरितां ह्या ब्रह्मवल्लीचा आरंभ करितो]. अतिशय मोठें व पुढें सांगितलेल्या लक्षणानें युक्त अशा ब्रह्माला जो जाणतो तो, ज्याहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं व ज्याला अज्ञानानें पूर्वी विसरला होता अशा ब्रह्माला जाणतो. ज्या वस्तूचें जें रूप निश्चित केलें असतां तें रूप ढळत नाहीं ती वस्तु सत्य होय. सत्य, ज्ञानस्वरूप आणि लोकांच्या ज्ञानाप्रमाणें नाश न पावणारें असें ब्रह्म बुद्धींतील विकाररहित आकाशांत आहे असें जो जाणतो, तो सर्वज्ञ ब्रह्मरूपानें सर्व इष्ट पदार्थांचा उपभोग घेतो असें " ब्रह्मविदाप्नोति " ह्या वाक्यांत सांगितलेल्या गोष्टीविषयीं " सत्यं ज्ञानं इ० " ही ऋचा सांगितली आहे.

द्वैतटीका–प्रधानब्रह्मविद्यामाह ॥ ब्रम्हविदिति ॥ **ब्रम्हवित्** परब्रह्मज्ञानी **परं** परब्रह्म **आप्नोति** परब्रह्माप्तिकामः परब्रह्म विद्यादित्यर्थः । तत्र किं लक्षणकं ब्रह्म कथंच तद्वेदनं नहि ब्रह्मपदेन प्रतीतस्यापरिच्छिन्नस्य साक्षात्कारो युक्तः कीदृशीच तत्प्राप्तिर्या ज्ञानसाध्या सर्वगतत्वेन नित्यप्राप्तत्वादित्युत्पन्नशंकात्रयं तादित्यादिना इतीत्यंतेन परिहरति । योवेदेति ॥ अपरिच्छिन्नपरिमाणस्यापि स्वशक्त्या भक्तानुकंपया **गुहायां** हृदये **परमे** उत्कृष्टे **व्योमन्** व्योम्नि आकाशे हृत्कर्णिकाया इतियावत्

१ सयोहवै तत्परमं ब्रम्ह वेद ब्रम्हैव भवतीति श्रुत्यंतरं

२ एतस्मिन् खल्वक्षरे गार्ग्याकाशओतश्चप्रोतश्चेति श्रुत्यंतरं

निहितं जीवोपकारिकार्यकारणप्रेरकतया स्थितं **सत्यं**[1] सत् जन्म जीवनं प्रवर्तनं नाशंच यापयतीति जगतः स्रष्टृचेष्टकसंहार्त्रित्यर्थः **ज्ञानं** सर्वविषयकज्ञानस्वरूपं **अनंतं** देशकालगुणापरिच्छिन्नं । सत्यत्वं ज्ञानत्वं अनंतत्वंच प्रत्येकं ब्रह्मणो लक्षणं ज्ञेयं अवश्यज्ञातव्यत्वा-दुक्तानि त्रीणि लक्षणानि । एतल्लक्षणत्रयविशिष्टं **ब्रम्ह** परब्रह्म परमात्मानं यः अधिकारी **वेद** जानाति **सः** अधिकारी **विपश्चिता** सर्वज्ञेन **ब्रम्हणा** परमात्मना विरिंचेन वा **सह सर्वान्** स्वयोग्यान् संपूर्णान् **कामान्** भोगान् **अश्नुते** भुंक्ते । ब्रह्मणासह तदधीनतया सुखभोगएव तत्प्राप्तिरिति तदभिप्रायः ॥ **इति एषा ऋक् तत्** आशंकात्रयं प्रति-तत्समाध्यर्थं **अभ्युक्ता** कथिता ॥ अत्र सत्यंज्ञानमित्यनेन ब्रह्म किं लक्षणकमित्याशंकापरिहारः । गुहानिहितं वेद इत्यनेन कथंच तद्वेदनमि-त्यस्य परिहारः । सोश्नुते इत्यादिना कीदृशोच तत्प्राप्तिरित्यस्य परिहार इत्यवगंतव्यं ॥

अर्थ–[मुख्य ब्रह्मविद्या सांगतो.] ब्रह्म (म्हणजे परमेश्वर) जाणणाऱ्याला मोक्ष प्राप्त होतो. [ब्रह्माचें लक्षण काय ? तें कसें जाणावें? कारण ब्रम्ह शब्दानें सांगितलेल्या अमर्यादित वस्तूचा साक्षात्कार संभवत नाहीं. आणखी ब्रह्म सर्वव्यापक असल्यामुळें तें नेहमीं आपल्या जवळ आहेच. असें असतां ज्ञानापासून ब्रह्माची जी प्राप्ति व्हावयाची ती कशी? ह्या तीन शंका उत्पन्न होतात; त्यांचा परिहार करितो.] जरी ईश्वर अमर्याद आहे तरी आपल्या शक्तीनें व जीवावर असलेल्या-प्रेमानें व प्रेम असल्यामुळें दयेनें हृदयांतील उत्कृष्ट आकाशांत म्हणजे हृदयाचे कळीच्या टोंकास जीवाचे कल्याणार्थ कार्य व कारण ह्यांची प्रेरणा करीत राहिलेलें सत्य म्हणजे उत्पत्ति, स्थिति, प्रवर्तन, व नाश हीं करणारें ज्ञान म्हणजे सर्व पदार्थांविषयीं जें ज्ञान तद्रूप ; अनंत म्हणजे देश, काल व गुण ह्यांनीं अपरिमित ; अशा तीन लक्षणांनीं युक्त असें परब्रम्ह जो जाणतो तो सर्वज्ञ परमात्म्यासहवर्तमान (अथवा ब्रम्हदेवा-सहवर्तमान) आपणास योग्य अशा सर्व इच्छित विषयांचा उपभोग

---

१ सत् सद्भावं जन्म यापयतीति यातेरंतर्णीतण्यर्थस्यातोनुपसर्गेकइति क-प्रत्यये आतोलोपइटिचेत्याकारलोपे अयस्मयादीनीति भसंज्ञायांमपदत्वेन जस्त्वाभावतया सत्यमिति रूपं

घेतो. ह्याचें तात्पर्य असें आहे कीं, ब्रम्हासहवर्तमान त्याच्या आधीन राहून सुखाचा उपभोग घेणें हीच परब्रम्हाची प्राप्ति होय. ह्याप्रमाणें ही ऋचा पूर्वी आलेल्या तीन शंकांचें समाधान करण्याकरितां सांगितली आहे. येथें असें लक्षांत आणावें कीं, ब्रम्हाचें लक्षण काय ह्या शंकेचें समाधान करण्यास्तव ब्रम्ह सत्य, ज्ञानस्वरूप व अनंत आहे, असें सांगितलें ; ब्रम्हास कोठें जाणावें ह्या शंकेचें समाधान करण्यास्तव ब्रम्ह हृदयगुहेंत आहे असें जाणावें म्हणून सांगितलें; ब्रम्हाची प्राप्ति कोणते प्रकारें होते ह्या शंकेचें समाधान करण्यास्तव जीव ब्रम्हाबरोबर सुखाचा अनुभव घेतो असें सांगितलें.

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नाद्रेतः । रेतसः पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः । तस्येदमेव शिरः । अयं दक्षिणः पक्षः । अयमुत्तरः पक्षः अयमात्मा । इदं पुच्छं प्रतिष्ठा तदप्येष श्लोको भवति ॥ इति प्रथमोऽनुवाकः ॥ १ ॥

अद्वैतटीका–**तस्मात्** मूलवाक्योक्तात् **एतस्मात् आत्मनः** आत्मस्वरूपात् **आकाशः** शब्दगुणोवकाशकरः **संभूतः** समुत्पन्नः **वै** निश्चयेन । **आकाशात्** स्वेन स्पर्शगुणेन पूर्वेण कारणगुणेन शब्देनच द्विगुणः **वायुः** संभूतः । **वायोः** स्वेन रूपगुणेन पूर्वाभ्यां शब्दस्पर्शाभ्यां त्रिगुणः **अग्निः** संभूतः **अग्नेः** स्वेन रसगुणेन पूर्वैश्च शब्दस्पर्शरूपैश्चतुर्गुणाः **आपः** संभूताः । **अद्भ्यः** स्वेन गंधगुणेन पूर्वैः शब्दस्पर्शरूपरसैः पंचगुणा **पृथिवी** संभूता । **पृथिव्याः ओषधयः** संभूताः । **ओषधीभ्यः अन्नं** संभूतं । **अन्नात्** रेतोरूपेण परिणतात् **पुरुषः** शिरःपाण्याद्याकृतिमान् संभूतः । **सः एषः पुरुषः अन्नरसमयः** अन्नरसविकारः **वै** निश्चयेन ॥ **तस्य** अन्नरसमयस्य पुरुषस्य **इदं** प्रसिद्धं **एव**

१पुरुषत्वे वा विस्तरात्मा सहि विज्ञानेन संपन्नतमो विज्ञातं वदति विज्ञातं पश्यति वेदश्वस्तनं वेद लोकालोकौ मर्त्येनामृतमीक्षतीत्येवं संपन्नो थेतरेषां पशूनामशनापिपासे एवाभिज्ञानमितिश्रुतिः

शिरः । **अयं** प्रसिद्धः पूर्वाभिमुखस्य दक्षिणो बाहुः **दक्षिणः पक्षः** । **अयं** प्रसिद्धः सव्यो बाहुः **उत्तरः पक्षः** । **अयं** अंगानां मध्यमो भागः **आत्मा** । **इदं** नाभेरवस्ताद्यदंगं तत् **पुच्छं** अधोवलंबनसाम्यात् पुच्छमिव **प्रतिष्ठा** प्रतितिष्ठत्यनयेति । **तत्** तस्मिन्नेव ब्राम्हणवाक्योक्तार्थे **अपि एषः** अन्नमयात्मप्रकाशकः **श्लोकः** मंत्रः **भवति** इति प्रथमोऽनुवाकः ॥ १ ॥

अर्थ—वरील वाक्यांत सांगितलेल्या आत्म्यापासून आकाश उत्पन्न झालें. आकाशाचा धर्म शब्द उत्पन्न करणें व पोकळी असणें हा आहे. आकाशापासून वायु उत्पन्न झाला. वायूंत स्वतःचा स्पर्श हा गुण असून, शिवाय आकाशाचा शब्द करण्याचा गुण आहे. वायूपासून अग्नि उत्पन्न झाला. अग्नीमध्यें स्वतःचा रंग हा गुण असून शिवाय आकाशाचा शब्द करण्याचा गुण व वायूचा स्पर्श हा गुण ह्याप्रमाणें तीन गुण आहेत. अग्नीपासून पाणी उत्पन्न झालें. पाण्यांत स्वतःचा रस हा गुण असून, शिवाय पूर्वीचे शब्द, स्पर्श व रूप ह्याप्रमाणें चार गुण आहेत. पाण्यापासून पृथ्वी उत्पन्न झाली. पृथ्वींत स्वतःचा गंध हा गुण असून, पूर्वीचे गुण शब्द, स्पर्श, रूप व रस ह्याप्रमाणें पांच गुण आहेत. पृथ्वीपासून वनस्पति उत्पन्न झाल्या. वनस्पतींपासून अन्न उत्पन्न झालें. अन्नाचें रेत बनून त्यापासून हात, पाय, डोकें, अशा आकृतीचा मनुष्य उत्पन्न झाला. अशा प्रकारें उत्पन्न झालेला मनुष्य हा अन्नाचा परिणाम आहे हें उघड आहे. ह्याचें (आपणास जें दिसतें) हेंच डोकें आहे, त्याची (पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां जो हात दक्षिणेकडे होतो) ही उजवी बाजू आहे, (जो हात उत्तरेकडे होतो) ही डावी बाजू आहे. हा (ह्मणजे अंगाचा मध्यभाग) आत्मा[1] आहे. हें (ह्मणजे बेंबीच्या खालचा भाग) खालीं लोंबणारें शेंपूट आहे. त्याच्या आधारानें मनुष्य असतो. ह्याविषयीं (ह्मणजे ब्राह्मण[2] वाक्यांत सांगितलेल्या अन्नमयकोशासंबंधीं) पुढील मंत्र आहे. हा पहिला अनुवाक ॥ १ ॥

---

१ मध्यं ह्येषामंगानामात्मेति श्रुतिः

२. ब्राम्हण व मंत्र असे वेदाचें दोन भाग आहेत.

